# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -३१४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १३ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## महाकुंभ, ६० लाख भाविकांनी केले पहिले स्नान

### १२ किमी पायी चालत आहेत भक्त; स्नान केल्यानंतर परदेशी भक्त म्हणाले - जय श्रीराम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३प्रयागराज**

महाकुंभ सुरू झाला आहे. आज पौष पौर्णिमेला पहिले स्नान आहे. यावेळी १ कोटी भाविक संगमात स्नान करणार आहेत. संगम नाक्यावर दर तासाला २ लाख लोक स्नान करत आहेत. आजपासूनच भाविक ४५ दिवसांच्या कल्पवासाला सुरुवात करणार आहेत.

संगम नाक्यासह सुमारे १२ किमी परिसरात स्नान घाट बांधण्यात आला आहे. संगमावर सर्व प्रवेश मार्गांवर भाविकांची गर्दी आहे. महाकुंभात वाहनांना प्रवेश



बंद करण्यात आला आहे. त्यामुळे भाविक १०-१२ किलोमीटर पायी चालत संगमावर पोहोचत आहेत.६० हजार सैनिक सुरक्षा आणि सुव्यवस्था राखण्यात गुंतले आहेत. पोलिस कर्मचारी स्पीकरवरून लाखोंच्या संख्येने गर्दीचे व्यवस्थापन करत आहेत. कमांडो आणि निमलष्करी दलाचे जवानही



ठिकठिकाणी तैनात आहेत.

कडाक्याच्या थंडीत परदेशी भाविकही न्हाऊन निघत आहेत. ब्राझीलचा एक भक्त फ्रान्सिस्को म्हणाला- मी योगाभ्यास करतो. मोक्षाचा शोध घेत आहे. भारत हे जगाचे आध्यात्मिक हृदय आहे. जय श्रीराम.

ॲपलचे सहसंस्थापक स्टीव्ह जॉब्स यांच्या पत्नी लॉरेन पॉवेल जॉबसही महाकुंभला पोहोचल्या आहेत. निरंजनी आखाड्यात त्यांनी विधी केला. कल्पवासही करणार आहेत.१४४ वर्षात दुर्मिळ खगोलीय संयोगाने महाकुंभ होत आहे. मुख्यमंत्री योगी यांनी पौष पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. गुगलनेही महाकुंभ संदर्भात एक खास फीचर सुरू केले आहे. महाकुंभ टाईप करताच पानावर आभासी फुलांचा वर्षाव होतो.

एडीजी भानू भास्कर म्हणाले - मेळा प्रशासन पूर्णपणे सतर्क आहे. पहाटे ३ वाजल्यापासून सर्व सैन्य तैनात आहे. सर्व अधिकारी सतत देखरेख करत आहेत. कुठेही अडचण नाही. जिथे कुठेही छोटीशी घटना घडत असेल तिथे पोलिस ताबडतोब तिथे पोहोचतात आणि कारवाई करतात.मूळचे म्हैसूरचे रहिवासी आणि आता जर्मनीमध्ये राहणारे जितेश प्रभाकर हे त्यांची पत्नी सास्किया नॉफ आणि मुलगा आदित्यसह महाकुंभात पोहोचले आहेत. म्हणाले- मी इथे (भारतात) राहतो की परदेशात राहतो हे महत्त्वाचे नाही, कनेक्शन असले पाहिजे. मी दररोज योगा करतो. माणसाने नेहमी स्वतःमध्ये प्रवास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.स्पेनहून आलेल्या भक्ताने सांगितले - आपण एका आध्यात्मिक प्रवासावर आहोत. मी गंगेत पवित्र स्नान केले. ते पूर्णपणे एन्जॉय केले. मी खूप भाग्यवान आहे.

दक्षिण आफ्रिकेहून आलेल्या एका भक्ताने सांगितले - महाकुंभ खूप सुंदर आहे. रस्ते मोकळे आहेत. लोक खूप मैत्रीपूर्ण आहेत. आम्ही सनातन धर्माचे पालन करतो.

**आज आणि उद्या भाविकांवर फुलांचा वर्षाव केला जाईल**

महाकुंभाच्या मुख्य स्नान उत्सवांच्या दिवशी, हेलिकॉप्टरमधून संत आणि भक्तांवर फुलांचा वर्षाव केला जाईल. पौष पौर्णिमा स्नान उत्सवापासून म्हणजेच आजपासून त्याची सुरुवात होईल. यानंतर, मकर संक्रांतीच्या अमृत स्नानादरम्यान पुष्पवृष्टी होईल.

## तुम्ही दिलेला शब्द पाळला, खूप-खूप आभार

### ओमर अब्दुल्लांनी केले पंतप्रधान मोदींचे कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३जम्मू काश्मीर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज(१३ जानेवारी) जम्मू-काश्मीरमधील गांदरबलमध्ये झेड-मोर बोगद्याचे उद्घाटन केले. यावेळी त्यांच्यासोबत जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्लानायज राज्यपाल मनोज सिन्हा आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरीही उपस्थित होते. बोगद्याच्या उद्घाटनानंतर मुख्यमंत्र्यांनी राज्यात शांततापूर्ण निवडणुका पार पाडल्याबद्दल पंतप्रधान मोदींचे आभार मानले.

मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणतात, आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त श्रीनगरमधील कार्यक्रमात तुम्ही (पीएम



मोदी) ३ अतिशय महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या होत्या. तुम्ही म्हणाला होता की, तुम्ही दिल(मन) आणि दिल्लीतील अंतर कमी करण्याचे काम करत आहात आणि हे तुमच्या कामातून सिद्ध झाले आहे. तुम्ही जम्मू-काश्मीरच्या जनतेला सांगितले होते की, लवकरच निवडणुका होतील आणि लोकांना त्यांच्या मतांद्वारे सरकार निवडण्याची संधी मिळेल. तुम्ही तुमचे शब्द खरे ठरवले आणि ४ महिन्यांत निवडणुका झाल्या. नवे सरकार निवडून आले आणि मुख्यमंत्री म्हणून मी तुमच्याशी बोलत आहे.

लोकांनी निवडणुकीत उत्साहाने सहभाग घेतला आणि कुठेही हेराफेरी किंवा सत्तेचा गैरवापर झाल्याची तक्रार आली नाही. कुठल्याही गडबडीशिवाय राज्यात शांततेत निवडणुका पार पडल्या, याचे श्रेय तुम्हाला, तुमच्या सहकाऱ्यांना आणि भारताच्या निवडणूक आयोगाला जाते. तुम्ही जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा बहाल करण्याचे आश्वासनही दिले होते. जेव्हा लोक मला याबद्दल विचारतात, तेव्हा मी त्यांना सांगतो की, पंतप्रधान मोदींनी निवडणुका घेण्याचे आश्वासन पूर्ण केले. मला विश्वास आहे की, लवकरच हे वचनही पूर्ण होईल आणि जम्मू-काश्मीरला पुन्हा पूर्ण राज्याचा दर्जा बहाल होईल, असा विश्वास अब्दुल्ला यांनी यावेळी व्यक्त केला.

पंतप्रधान मोदींच्या प्रयत्नांमुळे दुर्गम भागांना सीमेवरील युद्धबंदीचा खूप फायदा झाला आहे. माछिल, गुरेझ, कर्नाह किंवा केरन असो, अधिक पर्यटकांच्या आगमनाने लोकांना विकास आणि पर्यटनाच्या दृष्टीने फायदा होत आहे. सोनमर्गमधील झेड-मोर्ह बोगदा सुरू झाल्यामुळे वरच्या भागातील लोकांना यापुढे मैदानी भागात जाण्याची गरज भासणार नाही. वर्षभर ते श्रीनगरशी जोडले जातील. एक तासाचे अंतर १५ मिनिटांत कापले जाईल, याबद्दल सरकारचे आभार, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

## अमृता फडणवीसांनी लाडक्या बहिणींच्या देवाभाऊंसाठी घेतला खास उखाणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस नेहमी चर्चेत असतात. अमृता फडणवीस यांना काल पुण्याचे माजी नगरसेवक किरण दगडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या महिला मेळाव्याला हजेरी लावली होती. या कार्यक्रमात अमृता फडणवीस यांनी महिलांशी संवाद साधला आहे. त्यांनी महिलांना जगण्याचा मंत्र सांगितला आहे. अमृता फडणवीस यांनी देवेंद्र फडणवीसांचे नाव घेत उखाणादेखील घेतला आहे.

अमृता फडणवीस या गायिका आहेत. त्याचसोबत त्या सामाजिक कार्यात सक्रिय असतात. त्या नेहमी महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करतात. त्यासाठी वेगवेगळ्या मेळाव्यांनादेखील भेट देतात. असाच उल्लेख त्यांनी उखाण्यातदेखील केला आहे. त्यांनी महिलावर्गाला संबोधित देवेंद्र फडणवीसांचे नाव घेतले आहे.

अमृता फडणवीस कार्यक्रमात महणाल्या की, मी त्यांच्यासाठी आज चार ओळी



म्हणणार आहे. आज माझ्या नणंदा दिसत आहेत खास, देवेंद्रजी आहेत तुमच्या पाठीशी, प्रगती व्हावी तुमची झक्कास.

या कार्यक्रमात बोलताना त्यांनी महिलांना आपल्या नणंदा म्हटलं आहे. त्यांनी महिलांना जगण्याचा मंत्र सांगितला आहे. त्या म्हणाल्या की, आता आपलं नात नंनद भावजयीचं नात आहे.मी पुन्हा येईल पण लेट नाही येणार. मला उशीर झाला मी तुम्हाला सॉरी म्हणार नाही. कौशल्य विकास याचा पण आज उद्घाटन केलंय आणि ते आपल्यासाठी स्त्रियांसाठी पण आपण आपलं कुटुंबाबलिष्ठ तर आपल्या समाज बलिष्ठ आणि मग आपला देश बलिष्ठ.अमृता फडणवीस म्हणाल्या की,रोज हसायचं. मी पुढे माझ्या मुलीसाठी पण एक वाट मोकळी करू शकले असं वाटलं ते मी केलं. गाणं लग्नानंतर चालू ठेवलं. नाचणं असो किंवा बँकिंग असो मी सगळं चालू केलं.पण जेव्हाही कोणी टोले मारायचा मला तोंड करायचं तर मी काय करायचे लाफ्टर क्लब हसायचे आणि पुढे निघून जायची. चांगल्या कामासाठी तुम्हाला कोणी थांबू शकेल किंमत कोणाची झाली तर माझ्याकडे या डायरेक्ट तुम्हाला जी इच्छा आहे ते करा. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत पूर्णपणे लागून जा त्यामुळे तुमची मुलगी काय तुमचा मुलगा काय तुमचा कुटुंब सुखी होईल कारण स्त्री सुखी असली तर तिचं कुटुंब सुखी असतं तर त्यासाठी तुम्हाला सुखी व्हायला जे करायचं करा आम्ही तुमच्या पाठीशी आहे.

## २६ जानेवारीपासून काँग्रेस सुरू करणार 'संविधान वाचवा राष्ट्रीय पदयात्रा'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई**

राज्यघटनेच्या ७५ व्या वर्धापनदिनी २६ जानेवारी २०२५ रोजी 'जय बापू, जय भीम, जय संविधान' रॅलीचे राज्य, जिल्हा व ब्लॉक स्तरावर आयोजन करण्यात आले आहे. हे अभियान अधिक मजबूत करण्यासाठी २६ जानेवारी २०२५ ते २६ जानेवारी २०२६ या दरम्यान 'संविधान वाचवा राष्ट्रीय पदयात्रा' ही देशव्यापी जनसंपर्क मोहिम सुरु केली जाणार आहे. या अभियानात प्रदेश काँग्रेसचे सर्व पदाधिकारी, आजी माजी आमदार, खासदार, सेल व विभागाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होतील अशी



माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

दरम्यान, भाजपाकडून संविधान व संविधाननिर्मात्याचा सात्यत्याने अवमान केला जात असताना महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान, राज्यघटना, सामाजिक न्याय व समानतेच्या मुल्यांचे रक्षण करण्यासाठी काँग्रेस पक्ष कट्टीबद्ध आहे. याच हेतूने काँग्रेस पक्षाने 'जय बापू, जय भीम, जय संविधान' हे अभियान आयोजित केले आहे. देशपातळीवर ३ जानेवारीपासून हे अभियान सुरु झाले असून २६ जानेवारी रोजी मध्य प्रदेशातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, महू येथे एक भव्य रॅलीने त्याची सांगता होणार आहे.

## विरुद्ध दिशेने वाहन चालवणं नवी मुंबईतील दोन तरुणींच्या जीवावर बेतलं; कारच्या धडकेत मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ मुंबई**

दोन अवजड वाहनांच्या मधून दुचाकीवरून जात असताना दुचाकी घसरून दोन युवकांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच आज (१३ जानेवारी) दोन युवतींचा अपघातात मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या दोन तरुणी कॉल सेंटरवरून रात्रपाळी करून घरी परतत असताना त्यांच्या दुचाकीला कारने धडक दिली. यात एक युवती जागीच ठार झाली तर उपचार सुरू असताना दुसरीचा मृत्यू झाला. संस्कृती खोकले (वय २२) व अंजली पांडे (वय १९) अशी अपघातात मृत्यू झालेल्या युवतींची नावे आहेत. सकाळी पावणे सातच्या दरम्यान आपली रात्रपाळी करून अंजलीला बोनकोडे गावात सोडण्यास संस्कृती येत होती. बोनकोडे जवळ असणाऱ्या वीरशैव स्मशान भूमीनजिक त्या आल्या असता समोरून येणाऱ्या भरधाव कारने त्यांना धडक दिली. अपघात झाल्यावर कारचालक त्यांची मदत न करता निघून गेला. यात दुचाकीचालक संस्कृती जागीच ठार झाली तर अंजलीला आसपासच्या लोकांनी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. प्राथमिक तापसानुसार समजलं आहे की त्या विरुद्ध दिशेने स्कूटर चालवत होत्या. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय उपाळे पुढील तपास करीत आहेत.

बोनकोडे गावाकडे जाणाऱ्या पाम बीच रोडवर स्कोडा कारने या तरुणींच्या स्कूटरला धडक दिली. या अपघातात मरण पावलेली संस्कृती कामोठे सेक्टर १८ मधील रहिवासी होती. तर, अंजली कोपरखैरणेमधील बोनकोडे गावात राहत होती. तुर्भे एमआयडीसीमध्ये रात्रीची शिफ्ट संपवून या दोघी घरी जात होत्या. संस्कृती अंजलीला तिच्या घरी सोडून कामोठ्याला जाणार होती. मात्र, अंजलीला बोनकोडेला सोडण्यासाठी निघालेली संस्कृती पाम बीच रोडवर विरुद्ध मार्गावरून स्कूटर चालवत होती. त्याचवेळी एका स्कोडा कारने त्यांच्या स्कूटरला धडक दिली. या अपघातात दोघी ठार झाल्या.

## विधानसभेनंतर मोदी पहिल्यांदाच महाराष्ट्रात, महायुतीच्या आमदारांना देणार कानमंत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या १५ जानेवारीला मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते महायुतीच्या आमदारांशी संवाद साधणार आहेत. नौसेनेच्या दोन युद्धनौका आणि एका पाणबुडीचे पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे. लोकार्पण सोहळ्यानंतर पंतप्रधान मोदी महायुतीच्या आमदारांशी संवाद साधणार आहेत. तसेच आमदारांसोबत स्नेहभोजन देखील करणार आहेत.

विधानसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातील विक्रमी विजयानंतर पीएम मोदी कार्यक्रमासाठी पहिल्यांदाच महाराष्ट्रत येत आहेत. पीएम मोदी महायुतीच्या आमदारांना काय कानमंत्र देणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अमित शहांनी कालच पंचायत ते संसद नाऱ्यानंतर पीएम मोदी काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.पीएम मोदी



१५ जानेवारीला सकाळी १०.३० वाजता मुंबईतील नौदल डॉकयार्ड येथे तीन प्रमुख नौदल युद्धनौका सुरत, निलगिरी आणि वाघशीर यांचे लोकार्पण करणार आहेत. त्यानंतर दुपारी साडेतीन वाजता ते नवी मुंबईतील खारघर येथील इस्कॉन मंदिराचे उद्घाटन करतील. या दौऱ्यादरम्यानच ते महायुतीच्या आमदारांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करणार आहेत.

नवी मुंबईतील खारघर येथे श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिर या इस्कॉन मंदिराचे उद्घाटन पीएम मोदी करणार आहेत. ९ एकरमध्ये पसरलेल्या या प्रोजेक्टमध्ये अनेक देवी- देवतांचे मंदिर, वैदिक शिक्षण केंद्र, प्रस्तावित संग्रहालय आणि सभागृह आणि उपचार केंद्र यांचा समावेश आहे. वैदिक शिकवणींद्वारे वैश्विक बंधुता, शांतता आणि सौहार्दाला प्रोत्साहन देणे हा त्याचा उद्देश आहे.

## संपादकीय ......

# केजरीवाल नायक की खलनायक?

देशाची राजधानी असलेल्या दिल्ली विधानसभेसाठी येत्या ५ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. दिल्लीत गेली दहा वर्षे सलग सत्तेवर असलेला आम आदमी पक्ष विरुद्ध केंद्रात सत्तेवर असलेला भारतीय जनता पक्ष यांच्यात थेट लढाई आहे. आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल विरुद्ध पंतप्रधान नरेंद्र मोदी असे या निवडणूक युद्धाला स्वरूप प्राप्त झाले आहे. भाजपाने आपला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर केलेला नाही. निवडणुकीत तिसरा खेळाडू कॉंग्रेस पक्ष असला तरी विधानसभेत खाते उघडण्यासाठी कॉंग्रेसला हातपाय मारावे लागत आहेत.

दिल्लीत सध्या कडाक्याची थंडी आहे. झोंबरे वारे वाहत असतानाही राजकीय वातावरण मात्र गरम आहे. भाजपा विरुद्ध आप संघर्षात एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपाने कळस गाठला आहे. आप सत्तेची हॅटट्रीक संपादन करण्यासाठी झटत आहे, तर केजरीवाल यांना खलनायक ठरवून भाजपा तब्बल २७ वर्षांनंतर दिल्लीची सत्ता खेचू पाहत आहे. राजधानीतील एक कोटी पंचावन्न लाख मतदार दिल्लीचा मुकुट कोणाच्या मस्तकावर चढवणार हे ८ फेब्रुवारीला मतमोजणीनंतर स्पष्ट होईल.

निवडणुकीच्या कार्यक्रमाचा बिगुल वाजले आणि आप, भाजपा व कॉंग्रेस पक्ष यांच्या प्रचाराला जोर चढला. सभा, मिरवणुका, घरोघरी मतदारांच्या भेटी, रेवड्यांची खैरात आणि आश्वासनांचा भडीमार सुरू झाला आहे. दिल्लीकर मतदारांना आकर्षित करण्यासाठी तीनही राजकीय पक्षांत चढाओढ लागली आहे. गेल्या दहा वर्षांत आप सरकारने दिल्लीकरांना मोफत सेवांची सवय लावली. सरकारी शाळांचा कायाकल्प केला. अतिशय सुंदर, प्रशस्त व दर्जेदार शाळा विद्यार्थ्यांना आकर्षित करू लागल्या. खासगी शाळांच्या तोडीस तोड उत्तम शाळा उभारण्याचे प्रयत्न आप सरकारने केले. मोहल्ला क्लिनिक उभारून दिल्लीतील कानाकोपऱ्यांतील हजारो सर्वसामान्य लोकांना औषधोपचार सेवा उपलब्ध करून दिली. दोनशे युनिटपर्यंत मोफत वीज देण्याचे कामही आपने केले. महिलांना मोफत बस सेवा आणि ज्येष्ठांना मोफत तीर्थयात्रा या घोषणांमुळे आपची व्होट बँक वाढेल असे वातावरण दिल्लीत आहे. मध्य प्रदेशमध्ये तत्कालीन भाजपाचे मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान यांची 'लाडकी बहीण योजना' सुपर हिट ठरली व भाजपाला महिलांनी या राज्यात पुन्हा सत्ता मिळवून दिली. महाराष्ट्रातही महायुतीने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना जाहीर केली व तमाम महिला वर्गाने महायुतीला पुन्हा सत्ता मिळवून दिली. देशात आठ राज्यांत लाडकी बहीण योजना क्लीक झाली आहे. भाजपाची योजना केजरीवाल यांनी दिल्लीत पळवली आणि त्यांनी महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले. ज्येष्ठांना मोफत औषधोपचार तसेच ऑटो रिक्षाचालकांना १० लाखांपर्यंत विमा आणि मंदिराच्या पुजाऱ्यांना व गुरुद्वारातील ग्रंथींना दरमहा १८ हजार रुपये मानधन देण्याची घोषणा केली. आपने निवडणुकीच्या तोंडावर मतदारावर रेवड्यांचा वर्षाव केला म्हणून टीका करणार तरी कोण? कारण भाजपाही तेच करीत आहे व अन्य राज्यात रेवड्या उधळूनच भाजपाने सत्ता प्राप्त केली आहे. आपच्या घोषणा घराघरांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवल्या जात आहेत. त्यामुळे सलग दहा वर्षे सत्तेवर राहूनही, आपच्या दिग्गजांवर भ्रष्टाचाराचे आरोप होऊनही आणि आपचे चार बडे नेते जेलमध्ये जाऊनही त्याची धार रेवड्यांच्या वर्षावाने सौम्य होते का, हे या निवडणुकीत बघायला मिळेल.

गेल्या दहा वर्षांत दिल्लीत विकासकामांचा दिखाऊपणा वाढला आहे. भिंतींवर घोषणांची रंगरंगोटी वाढली आहे. कामापेक्षा जाहिरातबाजी वेगवान आहे. दिल्लीत वायुप्रदूषणाने टोक गाठले आहे. लहान मुले, महिला व ज्येष्ठांना हवा प्रदूषणाने आजाराला सामोरे जावे लागते आहे. रेल्वे व विमानसेवा खराब हवेमुळे विस्कळीत आहे. रोज सकाळी उशिरापर्यंत दिल्लीला प्रदूषित हवेने वेढलेले असते. यमुना नदी प्रदूषित आहे. दिल्लीकरांना प्यायला शुद्ध पाणी मिळत नाही हे मोठे दुर्दैव आहे. मोठा भ्रष्टाचार झाल्याने चांगले दर्जेदार रस्ते होत नाहीत, म्हणून लोकांमध्ये नाराजी आहे. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया, मंत्री सत्येंद्र जैन असे दिग्गज नेते जेल रिटर्न असून ते सध्या जामिनावर आहेत. मद्यविक्रीतील कोट्यवधींच्या घोटाळ्याने आप सरकारची प्रतिमा डागाळली आहे. मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान असलेल्या शीशमहालवर सुशोभीकरणाच्या नावाखाली ३३ कोटी रुपये खर्च झाल्याचा ठपका कॅगने ठेवल्याने आपला उतरती कळा लागली आहे. या सर्वांचा परिणाम मतदारांवर किती होईल, त्यावर सत्ता कोण काबीज करणार हे ठरणार आहे.

केजरीवाल तीन वेळा मुख्यमंत्री झाले, सलग दहा वर्षे दिल्लीत आप सत्तेवर आहे. मग दिल्ली हे विकासाचे मॉडेल का होऊ शकले नाही? मोफतच्या सेवा आणि रेवडी कल्चर आणि आता लाडकी बहीण योजनेचा केजरीवाल यांना का आधार घ्यावा लागतो? दिल्लीवरील आपदा या निवडणुकीत हटवा असे आवाहन पंतप्रधानांनी दिल्लीच्या मतदारांना केले आहे. म्हणूनच यंदाची निवडणूक ही आपला कठीण परीक्षा आहे. केजरीवाल हे नायक की खलनायक याचा कौल दि. ८ फेब्रुवारीला जाहीर होणार आहे.

# तुमच्या ट्रॅक्टरच्या टायरची लाईफ तपासण्यासाठी ही सोपी ट्रिक वापरा




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२** – ट्रॅक्टरच्या इंजिनची देखभाल जितकी महत्त्वाची आहे, तितकीच त्याच्या टायर्सची देखभाल देखील तितकीच महत्त्वाची आहे. परंतु शेतकऱ्यांकडे सहसा असे कोणतेही उपकरण नसते, ज्याद्वारे ट्रॅक्टरच्या टायर्सचे आयुष्य तपासता येते. म्हणूनच, ट्रॅक्टरच्या टायर लाईफ किती उरली आहे, हे आजच्या लेखातून जाणून घेऊयात...

इंजिननंतर, ट्रॅक्टरमध्ये सर्वात महागडी गोष्ट असते ती म्हणजे त्याचे टायर. म्हणूनच शेतकरी केवळ ट्रॅक्टरचीच नाही (त्रीशी ढीरर्ली) तर त्याच्या टायर्सचीही विशेष काळजी घेतात. ट्रॅक्टरचे टायर जास्त काळ टिकण्यासाठी, योग्य हवेचा दाब राखणे आणि ते नियमितपणे तपासणे आवश्यक असते. पण ट्रॅक्टरच्या टायर किती काळ चालतील, हे तपासणे आवश्यक असते.

**नाण्याने टायरचे आयुष्य तपासा**

ट्रॅक्टरच्या मागील टायर्समध्ये किती आयुष्य म्हणजेच ग्रिप शिल्लक आहे हे स्पष्टपणे दिसून येते. परंतु ट्रॅक्टरच्या पुढचा टायर तपासण्यात समस्या उद्भवते, कारण या टायर्सना फार जाड ग्रिप नसते. अशा परिस्थितीत, नाण्याच्या मदतीने तुम्ही ट्रॅक्टरच्या पुढच्या टायर्सचे आयुष्य तपासू शकता.

**नाण्याने कसे तपासायचे–**

**१. नाणे अर्धे टायरमध्ये टाकल्यानंतर**

जेव्हा तुम्ही ट्रॅक्टरच्या पुढच्या टायरच्या ग्रिपमध्ये नाणे ठेवता आणि जर त्याचा अर्धा भाग आत असेल आणि ५० टक्के नाणे बाहेर येत असेल, तर समजून घ्या की या टायर्समध्ये अजूनही बरीच ग्रिप किंवा जीव शिल्लक आहे. साधी गोष्ट अशी आहे की जर नाणे फक्त ५० टक्के बाहेर येत असेल तर टायरचे आयुष्य अजूनही १०० टक्के शिल्लक आहे.

**२. नाणे १/४ आतमध्ये गेल्यानंतर**

जेव्हा तुम्ही ट्रॅक्टरच्या टायरमध्ये नाणे घालता आणि ते फक्त १/४ भाग आतमध्ये जात असेल तर समजून घ्या की या टायर्सचे आयुष्य आता फक्त अर्धेच उरले आहे. म्हणजे जर नाण्याचा २५ टक्के भाग टायरच्या ग्रिपमध्ये गेला असेल, तर समजून घ्या की त्यात अजूनही ५० टक्के आयुष्य शिल्लक आहे. त्याचप्रमाणे, जर नाणे टायरच्या ग्रिपच्या २५ टक्क्यांपेक्षा कमी व्यापत असेल, तर त्याचे आयुष्य आता निम्म्यापेक्षा कमी आहे.

**३. नाणे पूर्णतः आतमध्ये गेल्यावर**

ट्रॅक्टरचा टायर तपासताना, जर चाकाच्या पकडीत नाणे क्वचितच दिसत असेल, तर समजून घ्या की टायर बदलण्याची वेळ आली आहे. जर नाणे ट्रॅक्टरच्या टायरच्या ५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त भाग व्यापत असेल, तर ते टायरमध्ये जीव शिल्लक नसल्याचे दर्शवते. जर असे असेल तर तुम्ही ताबडतोब टायर बदलून घ्या.

**हे आहेत तोटे**

बरेच शेतकरी त्यांचे ट्रॅक्टर जीर्ण झालेल्या टायरवर चालवतात आणि ते नवीन टायर टाकण्यास विलंब लावतात. जीर्ण झालेल्या टायर्सवर ट्रॅक्टर चालवल्यानेही खूप नुकसान होते. जर टायर खराब झाले असतील तर ट्रॅक्टर ओल्या जागी, चिखलात किंवा सैल मातीत घसरतो. यामुळे ट्रॅक्टरची कार्यक्षमता कमी होते आणि त्यावेळी जास्त डिझेलचा वापर होतो.

याशिवाय, जर ट्रॅक्टरचे टायर खराब झाले तर त्याच्या ब्रेकवरही वाईट परिणाम होतो. जेव्हा ट्रॅक्टरवरील भार जास्त असतो किंवा वेग थोडा जास्त असतो, तेव्हा टायर खराब झाल्यामुळे ट्रॅक्टरचे ब्रेक लागण्यास अडचण निर्माण होते. ही गोष्ट काही परिस्थितींमध्ये अपघातांना देखील कारणीभूत ठरू शकते.

# खेळात जिंकणे, हारने यापेक्षाही महत्वाचे आहे सहभागी होणे- दिपक कोकतरे

## जि.प.पूर्व माध्य मराठी शाळा, आसरा ठरली सातव्या वेळी प्राथमिक, माध्यमिक व जनरल चॅम्पियन्स ची मानकरी

**विदर्भ प्रजासत्ताक**




**दि.१३ भातकुली** पं. स.भातकुली अंतर्गत तालुकास्तरीय विद्यार्थी क्रीडा स्पर्धेचे आयोजन १०व११ जानेवारी २०२५ ला संत गाडगेबाबा विद्यालय सायत,या ठिकाणी करण्यात आले होते.खेळात हारणे,जिंकणे या पेक्षाही सहभागी होणे महत्वाचे आहे.प्राथमिक स्तरातुन राष्ट्रीय खेळाडू तयार होत असतात.ग्रामिण भागातील खेळाडू वृत्तीलावाव मिळावा म्हणुन क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते,असे प्रतिपादन भातकुली पं.स.चे गटशिक्षणाधिकारी दिपक कोकतरे यांनी व्यक्त केले. दोन दिवस चाललेल्या या क्रीडा स्पर्धेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमासह कबड्डी, खोखो,हॉलीबॉल,लंगडी,बॅडमिंटन, रिले रेस, कुस्ती,टेनिक्वाईट,धावणे, लांब उडी,उंच उडी, या सारखे सांघिक व वैयक्तिक खेळ घेण्यात आले. क्रीडा स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,या कार्यक्रमाला बक्षीस वितरक म्हणून मा.प्रविनजी वानखेडे साहेब (गटविकास अधिकारी, पं. स.भातकुली)उपस्थित होते,तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा.अन्नपूर्णाताई ज्ञा. मानकर (सरपंच, सायत) ह्या उपस्थित होत्या,कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मा.विशालदादा भट्टड (उपसरपंच, सायत),मा.दिपकजी कोकतरे साहेब (गटशिक्षणाधिकारी, पं. स.भातकुली),मा.रामरामजी वानखडे (सदस्य,ग्रामपंचायत सायत),मा.अशोकराव राऊत (पोलीस पाटील,सायत),मा.संजयजी इंगळे (सेवानिवृत्त शिक्षक),मा.संजयजी समदूरे (सामाजिक कार्यकर्ते),मा. पुष्पाताई रामावत (मुख्याध्यापिका,संत गाडगेबाबा विद्यालय,सायत),मा.पंजाबराव पवार (शिक्षण विस्तार अधिकारी)मा.जानरावजी सुलताने (केंद्रप्रमुख आष्टी),मा.निताताई सोमवंशी (केंद्रप्रमुख गणोरी),मा.नरेंद्रजी धनस्कर (केंद्रप्रमुख पूर्णानगर),मा.उमेशजी चुनकीकर (केंद्रप्रमुख खोलापूर),मा.रविंद्रजी धरमठोक (केंद्रप्रमुख वाठोडा शुकलेश्वर),मा.प्रफुलजी वाठ सर (केंद्रप्रमुख खारताळेगाव),मा.किशोरजी रुपणारायन (केंद्रप्रमुख आसरा),मा.रज्जबजी शाह सर (उच्च श्रेणी मुख्याध्यापक, भातकुली),मा.प्रशांतजी भाकरे व मा.शैलेंद्र स.दहातोंडे (केंद्रप्रमुख भातकुली)उपस्थित होते. बक्षीस वितरण सोहळ्यात जि.प.पूर्व. माध्य मराठी शाळा,आसरा ही प्राथमिक विभाग,माध्यमिक विभाग, व जनरल चॅम्पियन्स ची सातव्या वेळी मानकरी ठरली,तर जि.प.पूर्व माध्य मराठी शाळा खोलापूर मुले उत्कृष्ट निदर्शन ची मानकरी ठरली,तर सांस्कृतिक विभागामधून जि.प.पूर्व माध्य मराठी शाळा वाकी रायपूर प्रथम क्रमांक तर जि.प.पूर्व माध्य उर्दू शाळा खोलापूर कन्या द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शैलेंद्र स.दहातोंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन मा.वसंतजी लोहेकर सर यांनी मानले.असे प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.




# वयानुसार ब्लड शुगर किती असावी? तज्ज्ञ सांगतात डायबिटिस कसा टाळावा, समजून घ्या

**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक**

डायबिटीसच्या लक्षणांची ओळख आणि मॅनेजमेंटसाठी ब्लड शुगर किती असावी हे माहीत असणं महत्वपूर्ण आहे. शरीराच्या एनर्जीसाठी ब्लड शुगरची गरज नसते. ब्लड शुगर अनियंत्रित असल्यास हायपरग्लायसेमियाची स्थिती उद्भवते. अशा स्थितीत ग्लुकोज संबंधित स्थितीचे योग्य परिणाम दिसणं, वेट मॅनेजमेंट, वय आणि जीवनशैलीच्या आधारावर सामान्य ब्लड शुगर रेंज समजल्यास योग्य परिणाम दिसून येतात. रिपोर्टनुसार वयानुसार ब्लड शुगर लेव्हलच्या चार्टमध्ये उतार-चढ होतो. हेल्दी ब्लड शुगर कशी असते समजून घेऊया.

ब्लड शुगर लेव्हल २ मुख्य परीक्षणांमध्ये मोजले जाते. हायपरग्लायसेमिया किंवा हायपोग्लायसेमियाची लक्षणं वेळीच ओळखली जायला हवी. यावरून दिसून येतं शरीरातील ग्लुकोज कसं कमी करता येईल. या दोन्ही टेस्टबाबत महत्वाची महत्वपूर्ण माहिती दिली आहे. शरीर ब्लड शुगर लेव्हल मॅनेज करते. या दोन्ही टेस्ट महत्वपूर्ण माहिती देतात. ज्यामुळे शरीराची ब्लड शुगर मॅनेज करता येते.

डायबिटीज तसंच अन्य मेटाबॉलिक डिसॉर्डरच्या लक्षणांची ओळख समजणं गरजेचं आहे.

जर तुम्हाला उच्च रक्तातील साखर (हायपरग्लेसेमिया) असेल, तर तुमच्या फास्टींग रक्तातील साखरेची पातळी १३० ास/वङ च्या वर असेल आणि इतर रक्तातील साखर १८० ास/वङ च्या वर असेल. जर तुमच्या रक्तातील साखरेची पातळी सातत्याने या मर्यादेपेक्षा जास्त असेल तर तुम्हाला प्री-मधुमेह किंवा मधुमेह असू




शकतो. त्यावर नियंत्रण न ठेवल्यास हृदयविकार, मज्जातंतूंच्या समस्या आणि मूत्रपिंडाचे आजार यासारख्या गंभीर वैद्यकीय समस्या उद्भवू शकतात.

तुमच्या रक्तातील साखरेची पातळी कमी असल्यास (हायपोग्लायसेमिया), तुमच्या फास्टींग रक्तातील साखरेची पातळी ७० ास/वङ पेक्षा कमी असेल आणि यादृच्छिक रक्तातील साखरेची पातळी ६० ास/वङ पेक्षा कमी असेल. तुम्हाला चक्कर येणे, गोंधळ होणे, आणि क्वचित प्रसंगी रक्तातील साखरेचे प्रमाण कमी झाल्यामुळे फिट येऊ शकतात. हे सामान्यतः इन्सुलिन किंवा अँटीडायबेटिक औषधे घेत असलेल्या रुग्णांमध्ये आढळते, किंवा जे खूप दिवस उपवास करतात किंवा खूप वेळ व्यायाम करतात त्यांनासुद्धा ही समस्या उद्भवते.

# गजानन महाराजांचा जागतिक पारायण दिन सामूहिक पारायणाच्या माध्यमातून संपन्न

## सागर देशमुख व मित्र परिवाराचा स्तुत्य उपक्रम:

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.१३ अमरावती** –श्री गजानन महाराज मंदिर संस्थान राम विहार, क्रांती कॉलनी येथे रविवार दि.१२ रोजी सागर देशमुख व मित्रपरिवार व महारुद्र व्यक्ती मंडळ द्वारा संयुक्तरित्या आयोजित श्री गजानन महाराज विजय ग्रंथाच्या सामूहिक पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सोबतच दिनविशेष म्हणजे आज जिजाऊ मासाहेबांच्या जयंतीदिनी प्रतिमेच पूजन करण्यात आले. या आयोजनामध्ये तब्बल २६३ महिला व पुरुष सदस्यांनी मंदिर परिसरात जागतीक पारायण दिनीचे औचित्य साधून आपली शब्दसेवा महाराजांच्या चरणी अर्पण केली.सागर देशमुख मित्रपरिवार आपल्या परिसरातील नागरिकांच्या सेवार्थ सदैव समाजसेवी भूमिकेतून, आध्यात्मिक आणि सामाजिक आपुलकीतून समाजातल्या प्रत्येक घटकाची सेवा करण्याची संधी गजानन महाराजांच्या पारायनाच्या दिवशी आध्यात्मिक भावना जपण्याचा आदर्श समाजासमोर मांडला. पारायण नंतर लगेचच महाप्रसादाचे सुद्धा व्यवस्था सर्वांसाठी करण्यात आली होती. या महाप्रसादाचा मनसोक्त आस्वाद परिसरातील नागरिकांनी व गजानन महाराजांच्या भक्तांनी घेतला.या कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनाकरिता परिसरातील डॉ. अमोल भोयर, श्री सागर देशमुख, श्री.आकाश भोयर, डॉ.इशांत राजगुरे, विराज विघे,संकेत चौकडे,मंदार मालवणकर, राम वैश्य, मंथन वैश्य ,व्यंकटेश राठोड,धीरज जामणारे,श्रीकांत चुटके, समर्थ लोखंडे, प्रज्योत देशमुख, चिन्मय तायडे, पराग देशमुख, अशा अनेक युवकांनी आपली सेवा दिली.

# रब्बी ज्वारीवरील लष्करी अळीचा असा करा बंदोबस्त

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष



रब्बी ज्वारीवरअमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव होतो, त्यामुळे उत्पादनात मोठी घट येते. या किडीच्या प्रादुर्भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी एकात्मिक व्यवस्थापन पद्धतीचा वापर करावा. हवेतील आर्द्रता ७५ टक्क्यांपेक्षा जास्त, कमी सूर्यप्रकाश व हिवाळा या बाबी अळीच्या वाढीसाठी पोषक आहेत. त्यामुळे या अळीचे व्यवस्थापन कसे करावे, या लेखातून जाणून घेऊया.

अमेरिकन लष्करी अळीचे प्रादुर्भाव दिसून आल्यास खालीलप्रमाणे एकात्मिक व्यवस्थापन करावे

ज्वारीच्या पानावर दिसणारे अंडीपुंज व प्रथमावस्थेतील अळ्या गोळा करून नष्ट कराव्यात.

सर्वेक्षण आणि सामूहिकरीत्या पतंग पकडण्यासाठी एकरी ६ कामगंध सापळे लावावेत.

शेतात नैसर्गिक मित्रकीटकांचे संवर्धन करावे.

आर्थिक नुकसान पातळी (१० टक्के प्रादुर्भाव) असल्यास जैविक घटकांचा वापर करावा.

त्यात ट्रायकोग्रामा एकरी ५०-६० हजार अंडी याप्रमाणे एक आठवड्याच्या अंतराने तीनवेळा शेतात सोडावीत.

अळ्यांसाठी मेटारायझीयम ॲनिसोप्ली किंवा नोमुरिया रिलेई ४ ते ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीइतका झाल्यास, ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ॲझाडिरेक्टिन (१५०० पीपीएम) ५ मि.ली. प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

अधिक प्रादुर्भावाच्या स्थितीमध्ये रासायनिक नियंत्रणासाठी, क्लोर ॲण्ट्रानिलीप्रोल (१८.५ एससी) ०.३-०.४ मि.ली. किंवा थायमेथोक्झाम (१२.६%) लॅमडा सायहॅलोथ्रिन (९.५%) झेडसी) (संयुक्त कीटकनाशक) ०.५ मि.ली. अधिक स्टीकर ०.५ मि.ली. प्रति लिटर पाणी याप्रमाण फवारणी करावी.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १३ जानेवारी २०२५ शहर/ग्रामिण


# धारणी तालुका क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांची हेळसांड

## सोशल मीडियावर फोटो व्हायरल, शिक्षण विभागाविरुध्द कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३धारणी** – धारणी पंचायत समिती अंतर्गत सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शालेय क्रीडा स्पर्धेचे तालुकास्तरीय आयोजन ९ ते ११ जानेवारी यादरम्यान करण्यात आले होते. क्रीडा स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांची गैरसोय संबंधित शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आल्याची चर्चा सोशल मीडियाच्या माध्यमातून फोटो व्हायरल करून झाल्याचे दिसून आले होते. यानंतर प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांनी विद्यार्थ्यांची आवश्यकतेनुसार सोय झाली असल्याबाबत ग्वाही दिली आहे.




प्राप्त माहितीनुसार, जिल्हा परिषद माध्यमिक व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय धारणीच्या प्रांगणावर तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन पंचायत समिती धारणी अंतर्गत येणाऱ्या शिक्षण विभागाकडून करण्यात आले होते. गुरुवार दि. १० जानेवारी रोजी दिवसभर क्रीडा स्पर्धेमध्ये आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदविलेल्या विद्यार्थ्यांना रात्री खाली झोपविल्याचे आरोप महाराष्ट्र जनक्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष मन्ना दारसिबे यांच्याकडून फोटो व्हायरल करून करण्यात आले. तरदुथ्यहीन असल्याचे सांगून तथ्याथ्यांची खाण्याची आणि राहण्याची आवश्यकतेनुसार करण्यात आली होती असे सांगितले आहे. फोटोमध्ये दिसणाऱ्या हिरव्या चटई खाली शतरंजी टाकण्यात आली होती. इतकेच नव्हे तर विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार ब्लँकेट व चादरांची व्यवस्था करण्यात आली होती अशी माहिती शिक्षण विभागाकडून देण्यातआली आहे. विद्यार्थ्यांकरिता भोजन व्यवस्था करण्याकरिता भोजन समितीची नेमणूक आधीच करण्यात आली होती, विद्यार्थ्यांना पोटभर जेवण देण्यात आल्याचेसुद्धा शिक्षण विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

> विद्यार्थ्यांची सोय बघण्याकरिता मी स्वतः विद्यार्थ्यांना भेट दिली होती. चटई खाली नेमकी कोणती व्यवस्था करण्यात आली होती, हे आरोप लावणाऱ्यांनी प्रत्यक्ष येऊन बघितले नाही. विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार सतरंजी, चटई व ब्लँकेटची व्यवस्था करण्यात आली होती. यासोबतच भोजन समितीकडून पोटभर जेवणसुद्धा देण्यात आले आहे.
>
> – **सुनील खडे,** प्रभारीगटशिक्षणाधिकारी, पं.स. धारणी–

दुसरीकडे विद्यार्थ्यांची गैरसोय झाल्या प्रकरणी संबंधित शिक्षण विभागाविरुद्ध कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र जनक्रांती सेनेचे संस्थापक मन्त्रा दारसिंबे यांनी केली आहे.

# आज भोगी, उद्या मकर संक्रांतीनिमित्त तीळगुळ देऊन मनातील कटूता दूर करणार




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती–** मकर संक्रांती नवीन वर्षातील पहिला सण मंगळवारी १४ जानेवारीला साजरा केला जाणार असला तरी सोमवारी १३ जानेवारीला संक्रांतीच्या आदल्या दिवशी भोगी साजरी केली जाते. यानिमित्त रविवारी १२ जानेवारीला महिलांनी बाजारपेठेत वाणाचे साहित्य, तीळ–गुळ, काळा ऊस, गाजर, वाटाणा, बोरं, हरभरा, वालाच्या शेंगा, वांगी अशा पदार्थांची खरेदी केली. भोगीला मातीच्या भांड्यात भाज्या एकत्र करून त्यात तीळ, बोरं घालून भोगी साजरी केली जाते.

तीळ–गुळाचा लाडू देऊन तीळगूळ घ्या, गोडगोड बोला, असे सांगतात . मातीचे सुगडे त्यात बोरं, वाटाण्याची शेंग, हरभरा, गहू,गाजर व ऊसाचे तुकडे घालून त्यावर मातीचे झाकण ठेवले जाते. त्यांची पूजा करून देवाला तीळगुळासह तीळ–गुळाची पोळी, वालाच्या शेंगाची भाजी, मुगाची खिचडी असे नैवेद्य अर्पण केला जातो. त्यानंतर सुवासिनी एकमेकिंना सौभाग्याचे लेणे म्हणून वाणाचे वाटप करीत असतात. सौभाग्यवती महिला वाण घेण्यासाठी एकमेकींकडे जातात. या वेळी उखाणेही घेण्याची प्रथा आहे.

पतंगबाजी मर्यादित प्रमाणात शहरात मकर संक्रांतीच्या कालावधीत मर्यादित प्रमाणात पतंगबाजी होते. एव्हाना नायलॉन मांजाची विक्री, खरेदी, वापरावर बंदी असल्यामुळे त्यात सकारात्मक घट झाली आहे. तरीही काही शौकिन सुती धाग्याचा वापर करून पतंग उडवतात. केवळ मकर संक्रांतीला आकाशात पतंग दिसतात. त्यानंतर २६ जानेवारीपर्यंत काही प्रमाणात पतंगबाजी होत असते. सायन्सकोर मैदानासह इतरही ठिकाणी संक्रांतीच्या पर्वावर पतंगोत्सव साजरा केला जाणार आहे.

# चिखलदरा, मेळघाट मध्ये धुक्याची चादर सह अवकाळी पावसाच्या सरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३चिखलदरा**

मागील पाच दिवसांपासून जिल्ह्याचा पारा घसरला आहे. रविवारी पहाटे ६ वाजता चिखलदरानजीक आदिवासी पाड्यांमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली.

दुसरीकडे परतवाडा व अचलपूर तालुक्यातही पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या.

मेळघाटातील रस्त्यांवर पांढऱ्याशुभ्र धुक्याची चादर पसरली होती. हुडहुडी भरविणारी थंडी येथे कायमच आहे.

मेळघाटातील सर्वांत उंच ठिकाण असलेल्या माखला व चिखलदरा पर्यटनस्थळाचा पारा ९ अंश सेल्सिअसपर्यंत आला आहे. त्यामुळे पर्यटक व स्थानिक रहिवाशांसह आदिवासींना दिलासा मिळाला आहे. १५ दिवसांनंतर पुन्हा कडाक्याची थंडी पडू लागली आहे.

मेळघाटातील घाटवळणाच्या मार्गावर क्षणात अवकाळी पाऊस कोसळतो, तर क्षणात दयाखोऱ्यातून क्षणात शुभ्र धुके संपूर्ण परिसराला झाकून घेते. त्यामुळे नागमोडी वळणावरील रस्ते वाहनचालकांसाठी कसरत ठरत आहे.



# निंभी येथील टोल नाका त्वरित रद्द करा !

## जिल्हाधिकाऱ्यांना आठ दिवसांचा अल्टीमेटम्

### मोर्शीकरांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३मोर्शी –**

मोर्शीकरांवर जबरदस्तीने लादलेला निंभी येथील टोल नाका त्वरित रद्द करण्यात यावा, यामागणी संदर्भात आज दि.१२ जानेवारी रोजी घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये संतप्त नागरिकांच्या वतीने दि. २० जानेवारी रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन शासनाला ८ दिवसाचे अल्टिमेटन देण्यात येऊन मोठे जनआंदोलन छेडण्याचा इशारा सर्वपक्षीय नागरिकांच्या वतीने देण्यात आला.



निंभी टोल कृती समितीद्वारे रूपरेषा बैठकीचे आयोजन दुर्गामाता मंदिर दुर्गानगर मोर्शी येथे करण्यात आले होते. या बैठकीत सर्वानुमते जबरदस्तीने लादलेल्या अन्यायकारक निंभी टोल संदर्भात चर्चा करण्यात आली व निंभी टोल मोर्शी वासियांसाठी तसेच आजूबाजूच्या खेडे विभागातील रहिवाशांसाठी कशाप्रकारे बंद करण्यात येईल याचे नियोजन सर्वानुमते करण्यात आले. पुढील निवेदन संबंधित अधिकाऱ्याना देऊन येणाऱ्या सोमवारी म्हणजे २० जानेवारीला जिल्हाधिकारी अमरावती यांना निवेदन देऊन पंधरा दिवसाचे अल्टिमेटम सरकारला देण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

जर सरकारने मोर्शी व आजूबाजूच्या खेडे विभागात राहणाऱ्या नागरिकांसाठी हा टोल बंद नाही तर हजारोच्या संख्येने सहभागी होऊन जन आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला असे निंभीटोल मुक्त कृती समितीद्वारे या अतिशय महत्त्वाच्या रूपरेषा बैठकीत ठरले. या बैठकीला ॲड. आशिष टाकोडे, निलेशरोडे, प्रा. संजय पांडव, आप्पासाहेब गेडाम, नितीन उमाळे, निलेश गंथळे, विजय धाडे, प्रदीप पावडे, विलास बुरंगे, देव कुरवाडे, दिलीप पोटे, भरत राऊत, गोपी ठाकरे, अभिलाष व्यवहारे, विजय लेव्हलकर, संतोष ठाकरे, डॉ. आनंद घोंगडे, हेमंत लकडे, ॲड. स्वराज श्रीराव, नितीन वासनकर, प्रमोद राऊत यांच्या सह अनेक मान्यवर नागरिक उपस्थित होते.

# अमरावतीत गरम चहामुळे राजकीय वातावरण तापलं !

## रवी राणा आणि बच्चू कडू यांच्यामध्ये जुगलबंदी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती** माझ्या निवास्थानावर बच्चू कडू आणि यशोमती ठाकूर यांना चहा प्यायला आमंत्रण देण्यासाठी मी तयार आहे. किंवा त्यांच्या घरी जाऊन चहा घ्यायला तयार आहे. जिल्ह्यातील कोणताही नेत्यासोबत माझं वैर नाही, असं वक्तव्य आमदार रवि राणा यांनी अमरावतीतील एका कार्यक्रमात केलंय. त्यांच्या या विधानाला माजी आमदार बच्चू कडू यांनी प्रत्युत्तर दिलंय.युवा स्वाभिमान पार्टीच्या स्थापना दिनानिमित्त कार्यक्रमात आमदार रवी राणा यांनी केलेल्यावक्तव्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आलं आहे. या जिल्ह्यातील कोणताही नेता रवी राणाचा दुश्मन नाही. किंवा मतभेद नाही. जिल्ह्यातील कोणत्याही आमदारांनी मला चहा प्यायला बोलावलं तर, मी त्यांच्या घरी जायला तयार आहे, असं रवि राणा म्हणाले आहेत.



रवि राणा यांनी केलेल्या वक्तव्यावर माजी आमदार बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मनभेद आणि मतभेद यात फरक आहे. मनभेद होण्यासाठी थोडा वेळ लागेल तर, चहा पिण्याइतकं वातावरण आधी तयार करू. नंतर चहा घेऊ. रवी राणा आणि आमचा कायमचा वैर नाही किंवा खानदानी दुश्मनी नाही. याआधी जो प्रकार झाला आहे, तो मनभेदाचा होता. तो आधी चांगला करण्याचा प्रयत्न करू, अशी प्रतिक्रिया बच्चू कडू यांनी दिली आहे.

जिल्ह्याच्या विकासात आम्ही विरोध करत नाही. जिल्ह्याच्या विकासासाठी आम्ही कधी आडवे आलो नाही, असंही मत बच्चू कडू यांनी व्यक्त केलं. त्यामुळे रवी राणा यांच्या वक्तव्यानतंर यशोमती ठाकूर आणि बच्चू कडू या तीन नेत्यांमध्ये मैत्री होईल का ? तिन्ही नेते एकत्र चहासाठी भेटतील का? अशा प्रश्नांसह राजकीय चर्चांना उधाण आलं आहे.

# वाहनचालकाने लांबवले मालकाचे दीड कोटी रुपये

## वाहन चालकाच्या शोधासाठी पोलिसांची पथके केली रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती –** छत्रपती संभाजीनगर येथे राहणाऱ्या दोन व्यक्तींचे भागीदारीत शहरात भुखंड होते. या भुखंडांची विक्री शनिवारी ११ जानेवारीला झाली. त्याच व्यवहारातून व मित्राकडून उधार घेतलेले असे एकूण दीड कोटी घेऊन ते दोन्ही भागिदार रविवारी १२ जानेवारीला सकाळी साडेनऊ वाजता शहरातून छत्रपती संभाजीनगरला जाणार होते. मात्र हॉटेलवरुन निघण्यापूर्वीच पाच मिनीटात या भागिदारांच्या कारचालकानेच ती दीड कोटीची रक्कम घेवून पोबारा ठोकला. या प्रकरणी शहर पोलिस रक्कम घेऊन पळालेल्या कारचालकाचा शोध घेत आहेत.

प्रविण ऊर्फ पंडीत शेषराव केदार (३२, रा. अंढेरा, देऊळगाव राजा, बुलडाणा.) असे रक्कम घेऊन पळालेल्या कारचालकाचे नाव आहे. ही रक्कम राजेंद्र दामोधर शाह (५३) आणि दिनेश प्रताप पाटील (दोघेही रा. छत्रपती संभाजीनगर) यांची होती. शाह आणि पाटील या दोघांच्या मालकीचे शहरातील विद्यापीठ ते मार्डी मार्गावर ४३ भुखंड होते. या ४३ भुखंडांच्या विक्रीचा व्यवहार शाह व पाटील यांनी केला होता. दरम्यान शनिवारी या भुखंडांची रजिस्ट्रार कार्यालयात विक्री प्रक्रीया पूर्ण झाली, त्यामधून त्यांना १ कोटी २० लाख रुपये मिळाले.



शाह यांच्याकडे आहे विवाह सोहळा शाह यांच्या घरी आगामी काही दिवसात मुलाचा विवाह आहे, ते कंस्ट्रक्शन कंपनीत नोकरीसोबत भुखंड खरेदी, विक्रीचा भागिदारीत व्यवसाय करतात. त्यांनी अमरावतीतील भुखंड विक्री केले होते. त्यामधून १.२० कोटी रुपये मिळालेत आणि मुलाच्या लग्नासाठीच एका मित्राकडून ३० लाख रुपये उधारसुद्धा घेतले होते मात्र तत्पुर्वीच त्यांच्या कारचालकानेच या रकमेवर हात साफ केला आहे. दरम्यान प्रविण हा मागील ४ वर्षांपासून शाह यांच्याकडे चालक म्हणून कार्यरत आहे.

# युवा स्वाभिमान पक्षाचे माँ जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांना अभिवादन

## गरजू नागरिकांना साहित्याचे वितरण, विविध क्षेत्रातील व्यक्तींचा सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती–** माँ जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची प्रेरणा ही मनुष्याच्या जीवनात बदल घडवून आणण्याचे कार्य करते. असे प्रतिपादन आमदार रवी राणा यांनी केले. माँ जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंती, युवा स्वाभिमान पक्षाच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त युवा स्वाभिमान महोत्सव सोहळा साजरा केला. या वेळी ते बोलत होते. या वेळी गरजू नागरिकांना जीवनावश्यक साहित्यांचे वाटप केले.

या वेळी व्यासपीठावर आमदार रवी राणा, माजी आमदार रमेश बुंदीले, सुनील राणा, नीळकंठ कात्रे, जयराव वानखडे, शैलेंद्र कस्तुरे, कमल मालानी, विनोद जायलवाल, रमेशपंत घुसे, हरीष चरपे, विलास पवार, सुखदेव तरडेजा, प्रा.अजय गाडे यांच्यासह युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. तत्पूर्वी महोत्सवाची सुरुवात माँ जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेच्या पूजन करत मान्यवर नतमस्तक होऊन अभिवादन केले. या वेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. माँ जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. त्यासोबतच मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रातील कार्य करणाऱ्या नागरिकांचा सत्कार या वेळी करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संजय हिंगासपुरे, नितीन बोरेकर, ज्योती सैरिसे,




सुमति ढोके, नाना आमले, चंदा लांडे, किरण अंबाडकर, अजय जयस्वाल, विलास वाडेकर, आशिष कावरे, शिवदास घुले, दिलीप भाकरे, सिंधु मतलानी, विरेंद्र उपाध्याय, सिद्धार्थ बनसोड, अवि काळे,सुरेश चाफले, संजय गायकवाड, पवन केशरवानी, वंदना जामनेकर, मंगला जाधव, सिमा धवस, विजया घोडेस्वार, सत्येंद्रसिंग लोटे, शोभा किटके, राजू रॉय, रईसा परविन, रेखा संभे, प्रिती देशपांडे, किर्ती मोरे, प्रिती हिंगणकर, सुनिता राऊत, दिपा धाकडे, निता खडसे, पुष्पा अंबाडकर, माला खुरसुडे, आशा भस्मे, पुष्पलता चेचरे, संध्या सवई, मधुकर देऊळकर, आनंद जयस्वाल, मिथील तिवारी, कल्पना बनकर, अश्विनी ढोके आदींनी परिश्रम घेतले.

**सामाजिक,सांस्कृतिक कार्यक्रम**

या स्वाभिमान महोत्सवामध्ये सलून व्यवसाय धारकांना सलून कीटचे वाटप, गरजू नागरिकांना पी.आर. कार्डचे वाटप, पत्रकार बधूंचा सत्कार, विविध शासकिय विभागाकडून लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप, दिव्यागांना व इतर गरजू नागरिकांना विविध साहित्याचे वाटप व कार्यकर्ता समाज मेळावा आदी कार्यक्रमाचा समावेश होता.

# गोल्डन फायबर मधील दोनशे कामगारांना पिण्याच्या पाण्यातून विषबाधा

## व्यवस्थापनाने कामगारांना उपचार घेण्यापासून रोखले,

## युवा स्वाभिमान पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केली व्यवस्थापकाची धुलाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ नांदगाव पेठ-** पंचतारांकित एमआयडीसी मधील गोल्डन फायबर नामक कंपनी मध्ये रविवारी सकाळच्या सामान्य शिफ्ट मधील तब्बल दोनशे कामगारांना पिण्याच्या पाण्यातून विषबाधा झाल्याने खळबळ उडाली. सकाळी नऊ वाजताच्या दरम्यान कामगारांमध्ये हा प्रकार घडल्यानंतर कंपनी व्यवस्थापना ने स्थानिक वैद्यकीय चमूला पाचारण करून बाधित कामगारांवर उपचार केले मात्र वैद्यकीय चमूने परिस्थिती नियंत्रणाबाहेर असून सर्वांना रुग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिल्यानंतर व्यवस्थापना मधील जे. एस. रावत याने बाधित कामगारांना रुग्णालयात गेले तर नोकरीवरून काढून टाकू असा धमकीवजा इशारा दिल्याने अनेक कामगार आपापल्या घरी परतले मात्र मनसेचे पप्पू पाटील यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी तातडीने नांदगाव पेठ पोलिसांना घेऊन कंपनीमधील अत्यवस्थ कामगारांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. गोल्डन फायबर धागा बनवणारी कंपनी असून याठिकाणी सातशे पेक्षा अधिक कामगार काम करतात.रविवारी सकाळी ९ ते ५ या सामान्य शिफ्ट मध्ये दोनशे पन्नास कामगार कामावर रुजू झाले. कामावर रुजू होण्यापूर्वी कंपनीच्या कँटीन मध्ये सर्व महिला व पुरुष कामगारांनी सकाळचा नाश्ता केल्यानंतर पाणी प्यायले आणि क्षणार्धात सर्वांना उलटी, मळमळ व पोट दुखण्याचा त्रास सुरू झाला.व्यवस्थापनाला याबाबत माहिती दिल्यानंतर व्यवस्थापन मधील जे.एस.रावत याने तातडीने वैद्यकीय चमुला पाचारण केले.वैद्यकीय चमूने सर्वांची तपासणी केल्यानंतर त्यातील अत्यवस्थ कामगारांना रुग्णालयात दाखल करण्याचा





सल्ला दिला मात्र रावत याने कामगारांना ओआरएस पावडर देऊन बळजबरीने काम करण्याच्या सूचना दिल्या तसेच रुग्णालयात न जाण्यासंदर्भात कामगारांना तंबी दिली. काही अत्यवस्थ कामगारांना माहुली जहागीर व गावातील रुग्णालयामध्ये उपचार घेण्याच्या अटीवर त्यांना बाहेर सोडले मात्र शंभर पेक्षा अधिक कामगारांना कंपनीत डांबून ठेवल्याने याबाबतची माहिती मनसेचे पप्पू पाटील यांना मिळाली.पप्पू पाटील यांनी त्यांच्या कामगार अध्यक्षांना कंपनीमध्ये पाठवले मात्र रावत याने कंपनीत प्रवेश नाकारल्याने पप्पू पाटील यांनी नांदगाव पेठ पोलीसांना सोबत घेऊन गोल्डन फायबर कंपनीत प्रवेश केला आणि सर्व बाधित कामगारांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती खा. बळवंत वानखडे, आ. रवी राणा, प्रहारचे जीलाध्यक्ष छोटू महाराज वसू,महानगर प्रमुख बंटी रामटेके यांना मिळताच त्यांनी सुद्धा जिल्हा सामान्य रुग्णालयात भेट देऊन रुग्णांची विचारपूस केली.रुग्णांवर योग्य उपचार करून त्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करण्यासंदर्भात खा. वानखडे यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय प्रशासनाला सूचना दिल्या. पप्पू पाटील यांनी पुढाकार घेतल्यानंतर गोल्डन फायबर मधील बाधित कामगार जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल झाल्याने व्यवस्थापनामधील जे.एस. रावत व मंगेश घोडे यांनी कामगारांवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला त्यामुळे युवा स्वाभिमान पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मंगेश घोडे याची जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या परिसरातच धुलाई केली. दाखल रुग्णामंध्ये अमृता राजू कंगाले, स्वाती निलेश रोकडे, पूजा भारत मेश्राम, योगिता संजय लांडगे,मीना विनोद उके, किरण नितीन गायकवाड, योगिता जगन्नाथ खोपे, कविता सुधीर शिंगाळे, प्रांजली छत्रपती मनोहरे, अनिता प्रेमदास वानखडे, रेशमा नंदू तायडे, सोनू राजेश चव्हाण, वर्षा प्रभाकर इंगळे, साधना धरम ढोके,लीला कवडू नन्नावरे,रत्नमाला प्रमोद निकोसे, रवीना मनोहर चांदणे, मंजू रवी बागडे, मीना सुशील कांबळे, सीमा संजय तुपकर, चित्रा गोपाल ठाकरे, सुमन महेंद्र कोकाटे,भाग्यश्री रोशन लोणारे,पूजा सचिन वानखडे, शिल्पा संजय धनसुईकर, जयश्री मंगेश वालीवकार, सुवर्णा दिनेश वानखडे, प्रीती बाळू माने, मीना सुरेश तायडे,रंजना देविदास तिडके, चंदा कैलास घोडेस्वार, चित्रा तायवाडे, माधुरी प्रशांत वानखडे,वैशाली कामोलकर चित्रा केणे, अर्चना बालपांडे,अक्षय अशोक उईके,पंकज जटाये,प्रफुल्ल गजभिये बिट्टू पटेल,प्रदन्यूम चौराया यांचा समावेश असून अकरा अत्यवस्थ रुग्णांना दाखल करण्यात आले तर इतर रुग्णांवर उपचार करून त्यांना डिस्चार्ज देण्यात आला.

### पोलिसांकडून कायदेशीर कारवाईचे संकेत

घटनेची तातडीने दखल घेऊन नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे ठाणेदार महेंद्र अंभोरे व पोलीस कर्मचारी यांनी गोल्डन फायबर मधील रुग्णांना बाहेर काढून त्यांना उपचारार्थ जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. सर्व रुग्णांचे बयाण घेण्यात आले. उद्या गोल्डन फायबर मधील पाण्याचे नमुने तपासणी साठी पाठविण्यात येणार असून त्यांनतर व्यवस्थापनावर कायदेशीर कार्यवाही करण्याचे संकेत पो.नि. अंभोरे यांनी दिले

### कामगारांमध्ये संताप

दरम्यान गोल्डन फायबर मधील कामगारांनी व्यवस्थापनाविरोधात संताप व्यक्त करत त्यांच्या हुकूमशाही धोरणाचा निषेध केला. जे.एस.रावत यांच्या हुकूमशाही आणि कामगार विरोधी धोरणामुळे अनेक कामगारांमध्ये संताप आणि चीड यावेळी दिसून आली. पोलीस आणि पप्पू पाटील यांनी लगेच दखल घेतलीनसती तर अनेक कामगार मृत्यूमुखी पडले असते असा दावा सुद्धा संतप्त कामगारांनी केला. यावेळी जिल्हा सामान्य रुग्णालयात गोंधळ निर्माण झाला होता.

# जिल्हा परिषद बांधकाम विभाग अमरावती मधील निविदा घोटाळा करणारा आका अजूनही मोकाटच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती-** प्रशासकीय राज लागल्यापासून जिल्हा परिषद बांधकाम विभाग अमरावती चे कार्यकारी अभियंता यांनी निविदा सूचना काढण्याचा जो झपाटा लावला होता त्या निविदा बाहेरच्यांना भरू नये म्हणून काही जाचक अटी टाकून (ज्या अटीला शासनाचा काहीच आधार नाही) मर्जीतील काही निवडक कंत्राटदारांना कामे देत असल्याची तक्रार महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ अमरावती व युवक काँग्रेस च्या वतीने मार्च २०२४ पासून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांच्या कडे वारंवार केली होती. प्रशासकीय राज लागल्यापासून या निविदा कमिटी मधे असलेल्या अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांची आर्थिक नुकसान केली असल्याची सुद्धा तक्रार केली होती. गेल्या ८, ९ महिन्यापासून केलेल्या तक्रारीचा पाठवपुरवा संघटनेने केल्याने घोटाळा करणारा आकां आणि त्याचा आका दोघांना पण कळले होते की आता आपण फसलो, कारवाई आपल्यावर होणारच म्हणून एका साध्या कर्मचाऱ्याचा बळी घेतला असल्याची चर्चा जिल्हा परिषद बांधकाम विभाग अमरावती मधे आहे. निविदा सूचना वर ज्यांची ‍ि‍ळसप असते, टेंडर ओपन करतांना , तांत्रिक मान्यता देताना, ज्यांची वील श्ररसींश असे कार्यकारी अभियंता आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी हे महत्त्वाचे आरोपी असायला हवे पण त्यांनी एक सामान्य निविदा लिपिक याला बळीचा बकरा बनवून स्वतः अजूनही मोकाटच फिरत आहे,




संघटनेने प्रत्येक तक्रारीचे कागदोपत्री पुरावे सादर करून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांना हेच दाखवून दिले की हे सर्व घोटाळे निविदा समितीनेच केलेले आहे तरीपण मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांनी आकावर डोळे झाक करून फक्त नाममात्र चौकशी करीत असल्याचे दाखवत आहे आणि ज्या माणसाची एकट्याची चूक नाही त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. निलंबनाची कारवाई तर कार्यकारी अभियंता, तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेवर करणे अपेक्षित होते असे सर्वांचे मत व्यक्त होत आहे परंतु जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नाममात्र चौकशी करीत असल्याचे दाखवून का निलंबन करत नाही हे मात्र गुलदस्त्यात आहे. केलेल्या तक्रारीचे पुरावे असून सुद्धा कारवाई होत नसेल तर मग मात्र दाद कोणाला मागावी... जिल्हा परिषद मध्ये टेंडर मॅनेज करणारी मोठ्या ठेकेदारांची टोळी सक्रिय आहे जे लोक सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांच्या कामावर गदा आणतात अशा लोकांचे मुखवटे फाटावेत अशी सगळ्यांना अपेक्षा आहे...

# १४ जानेवारीपासून जिल्हास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सवानिमित्त अमरावतीतखेळांचा महाकुंभ

## श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे मैदान खेळाडू विद्यार्थ्यांसाठी सज्ज, जिल्हा परिषदेच्या अडीच हजार विद्यार्थी व शिक्षकांचा राहणार सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती-** शिक्षण विभाग जिल्हा परिषद अमरावती तर्फे येथील विभागीय क्रीडा संकुलात १४ जानेवारीपासून १६ जानेवारी पर्यंत जिल्हा स्तरीय प्राथमिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे मैदानात करण्यात आले आहे.दरम्यान यासंदर्भात विविध समित्यांची नियोजन सभा रविवारला (ता.१२) संपन्न झाली. जिल्हा परिषद अमरावती तर्फे दरवर्षी प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सवाचे आयोजन हे केंद्र स्तरापासून ते जिल्हा स्तरापर्यंत केल्या जाते.या क्रीडा महोत्सवात अमरावती जिल्हातील १४ पंचायत समिती मधिल जवळपास अडीच हजार विद्यार्थी,मार्गदर्शक व खेळ प्रभारी शिक्षक उपस्थित राहणार आहे.क्रीडा व महोत्सव यशस्वी करण्याकरीता विविध समित्या तयार करण्यात आल्या आहे. या क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटक म्हणून राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे उपस्थित राहणार आहे.तर सोहळ्याचे अध्यक्ष पद अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे भुषवतील.विशेष अतिथी म्हणून वर्धेचे खासदार अमर काळे उपस्थित राहणार आहे.तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार किरण सरनाईक,आमदार धीरज लिंगाडे,आमदार रवि राणा,आमदार सुलभा खोडखे,आमदार प्रताप अडसड,आमदार केवलराम काळे,आमदार प्रवीण तायडे,आमदार राजेश वानखडे,आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर,आमदार गजानन लवटे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक (भा.प्र.से) संजिता मोहपात्र,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रीती देशमुख,सहाय्यक प्रकल्प अधिकारी तुळशीराम चव्हाण,सामान्य प्रशासन व पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बयास,महिला व बालकल्याण विभागाचेउपमुख्य कार्यकारी अधिकारी विलास मरसळे,पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय खारकर,जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी अश्विनी मारणे,ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड व आदी उपस्थित राहणार आहे.अशी माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी अरविंद मोहरे,माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख,माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी अनिल कोल्हे,प्राथमिक विभागाचेउपशिक्षणाधिकारी बुध्दभूषण सोनोने,माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी निखिल मानकर,क्रीडा संयोजक प्रवीण खांडेकर यांनी दिली. हा क्रीडा महोत्सव प्रामुख्याने दोन विभागामध्ये खेळला जाणार आहे.प्राथमिक विभागात इयत्ता पहिली ते पाचवी तर माध्यमिक विभागात इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे.प्राथमिक आणि माध्यमिक विभागामध्ये




प्रामुख्याने सांघीक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते.तीन दिवसीय या क्रीडा महोत्सवाकरिता सर्व विद्यार्थ्यांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था जिल्हा परिषद अमरावतीच्या वतीने करण्यात आली आहे.असे प्रसिध्दी समितीचे विनोद गाढे, विनायक लकडे, राजेश सावरकर, शकील अहमद, श्रीनाथ वानखडे यांनी कळविले आहे.

क्रीडा व महोत्सव यशस्वी करण्याकरीता विविध सोळा समित्या तयार करण्यात आल्या आहे.यात मुलींच्या निवास समितीच्या प्रमुख नांदगाव येथील गटशिक्षणाधिकारी कल्पना ठाकरे ह्या आहेत.मुलांच्या निवास समितीचे प्रमुख मोर्शी येथील गटशिक्षणाधिकारी गुणवंत वरघट,नोंदणी समिती प्रमुख अंजनगाव येथील गटशिक्षणाधिकारी श्री.भ. गिरासे,प्रसिध्दी समिती प्रमुख वरूडचे गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे,भोजन समितीचे प्रमुख चांदुर रेल्वेचे गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे,आरोग्य समितीचे प्रमुख दर्यापुरचे गटशिक्षणाधिकारी संतोष घुगे,कार्यालयीन समितीचे प्रमुख शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीण खांडेकर,सांस्कृतिक कार्यक्रम समिती प्रमुख भातकुलीचे गटशिक्षणाधिकारी दीपक कोकतरे व धामणगावच्यागटशिक्षणाधिकारी सपना भोगावकर हे आहेत.स्वागत समिती प्रमुख तिवसाचे गटशिक्षणाधिकारी डॉ.नितीन उंडे,बक्षिस वितरण समिती प्रमुख अमरावतीचे गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे,पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे प्रमुख अचलपूरचे गटशिक्षणाधिकारी राम चौधरी,लेखा समिती प्रमुख लेखा अधीक्षक अश्विनी पवार,निर्णय समिती प्रमुख शिक्षण विस्तार अधिकारी गंगाधर मोहने,मैदान समिती प्रमुख चांदुर बाजारचे गटशिक्षणाधिकारी वकार अहमद, छायाचित्रण समिती प्रमुख चिखलदराचेगटशिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे, सनियंत्रण समितीचे प्रमुख प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी अरविंद मोहरे हे आहेत.क्रीडा महोत्सवामध्ये प्राथमिक विभाग सांघिक खेळ कबड्डी,खो-खो वैयक्तिक खेळ मध्ये लंगडी,७५मी.धावणे,लांब व उंच उडी,दोरीवरील उड्या याचा समावेश असुन माध्यमिक विभागात सांघिक खेळात कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, टेनिक्वाइड, दुहेरी, बॅडमिंटन दुहेरी,१००४ रिले,वैयक्तीक खेळ मध्ये १००मी.धावणे,लांब व उंच उडी,कुस्ती,गोळा फेक,टेनिक्वाइड मुली याचा समावेश आहे.

# स्वच्छता कंत्राटात दुरुस्ती करून आता जबाबदारी निश्चित करणार

## धुवारणी, फवारणीबाबत नव्याने विचाराची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती -** प्रभागनिहाय स्वच्छता कंत्राटामध्ये जबाबदार कंत्राटदाराविरोधात आर्थिक दंडाची कारवाई करण्याची तरतूद होती. परंतु झोननिहाय कंत्राटात अशी कोणतीच सोय नाही. त्यामुळे जर कंत्राटदारांकडून कामात हयगय होत असेल तरीही त्यांच्याविरोधात जबाबदारी निश्चित करून कारवाई करता येत नाही. ते बघता कंत्राटातील अटी-शर्तीनुसार मनपा आयुक्त त्यांचा अधिकार वापरून जबाबदारी निश्चित करण्यासाठी कंत्राटात दुरुस्ती करण्याच्या प्रयत्नांत असून अतिरिक्त आयुक्तांनी यासंदर्भातील पत्र तयार करून मनपा आयुक्तांना दिले आहे.

मनपाच्या स्वच्छता यंत्रणेचे सध्या हात बांधलेले असल्यामुळे त्यांना झोननिहाय कंत्राट मिळवणाऱ्या कंत्राटदारांविरोधात काहीच करता येत नाही. मात्र, जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आली असून कंत्राटदारांनी त्यांचे १०० टक्के काम

करावे हीच मनपाची अपेक्षा आहे. घंटागाड्या पुरेशा नसून त्या एकूण १३० आहेत. त्यातही काहींची स्थिती फारच वाईट आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक झोनमध्ये प्रभागनिहाय किती स्वच्छता कर्मचारी असावेत, याबाबतही निश्चिती करणे आवश्यक झाले आहे. एवढेच नव्हे तर घुवारणी, फवारणी यंत्रेही आवश्यक आहेत. याबाबत एकूणच संपूर्ण निश्चिती करण्यासाठी



मनपा आयुक्तांनी ठोस पावले उचलण्याची आवश्यकता असल्याचा इशारा दिला आहे.

झोननिहाय कंत्राटात दंडाची तरतूद नसल्याने अडचणी झोननिहाय स्वच्छता कंत्राटात कोणतीही दंडाची तरतूद नसल्याने सध्या दोषीविरोधात जबाबदारी निश्चित करताच येत नाही. त्यामुळे मनपा स्वच्छता अधिकाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. चांगल्या अन् वाईट अशा दोन्ही बाजूंचा विचार करून आता ठोस निर्णय घेण्याची वेळ आली आहे, अशी माहिती मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी दिली.

# अपघातग्रस्तांना मदत करा अन् २५,००० मिळवा!

## नितीन गडकरी यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ नागपूर-** रस्ते अपघातात अपघातग्रस्तांना 'गोल्डन अव्हर' मध्ये मदत करणे अत्यावश्यक आहे. आतापर्यंत मदत करणाऱ्यांना ५ हजार रुपये मिळायचे. आता ते वाढवून २५ हजार रुपये करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी येथे दिली.राष्ट्रीय महामार्ग परिवहन आणि न्यूज-१८ लोकमत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रस्ते सुरक्षा कार्यक्रमांत शनिवारी अभिनेते अनुपम खेर यांनी गडकरी यांची प्रकट मुलाखत घेतली. गडकरी यांनी अनुपम खेर यांच्या सर्व प्रश्नांना उत्तरे दिली.गडकरी म्हणाले, वाहतुकीचे नियम तोडणाऱ्यांना दंड ठोठावला. कायदे कडक केले; तरीही रस्ते अपघातातील मृत्यू थांबलेले



नाहीत. मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत आपण यावर नियंत्रण मिळवू शकत नाही. शालेय शिक्षण घेण्याच्या वयात मुलांवर चांगल्या गोष्टींचा प्रभाव पडला तर तो कायमस्वरूपी राहतो. त्यामुळे शालेय जीवनातच वाहतुकीच्या नियमांचे धडे मिळणे आवश्यक आहे.

**अपघातात ४८ टक्के घट-** भारतात १० हजार विद्यार्थी हे सदोष ट्रॅफिक व्यवस्थेमुळे तर ३० हजार विना हेल्मेटमुळे दगावतात. नागपूरचे पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार आणि रोडमार्क संस्थेने ४८ ब्लॅक स्पॉट दुरुस्त केल्यानंतर अपघातांची संख्या ४८ टक्क्यांनी कमी झाली. गडकरी म्हणाले, कोरोना, युद्धामध्ये किंवा एखाद्या दंग्यामध्ये जेवढ्या लोकांचा मृत्यू झाला नसेल तेवढे मृत्यू दरवर्षी रस्ते अपघातामध्ये होतात याची खंत वाटते.

देशात आणखी उत्तम रस्ते तयार होतील. पण लोकांना शिस्त नसेल तर याचा काहीही उपयोग नाही. सिग्नल तोडणे, वेग मर्यादा ओलांडणे, हेल्मेट नसणे अशा कितीतरी चुका लोक करतात. घरी आई, पत्नी, मुले वाट बघत असतील, हे ध्यानात ठेवून गाडी चालवावी. रस्ते सुरक्षा क्षेत्रात काम करणारे राजू मानकर आणि चंद्रशेखर मोहिते यांचे त्यांनी विशेष कौतुक केल

# ‘एमपीएससी’च्या समाज कल्याण अधिकारी पदाचा निकाल जाहीर, मात्र केवळ ‘या’ उमेदवारांना मुलाखतीची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नागपूर**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) समाज कल्याण अधिकारी, गट-ब आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब या पदांच्या परीक्षांना सुधारित आरक्षण निश्चितीसाठी स्थगिती देण्यात आली होती. परीक्षा लांबल्याने विद्यार्थ्यांची चिंता वाढल्याचे वृत्त ‘लोकसत्ता’ने प्रकाशित केल्यावर आयोगाने याची दखल घेत सुधारित जाहीरात प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार १८ ऑगस्टला परीक्षा घेण्यात आली. समाज कल्याण अधिकारी, गट-ब या परीक्षेसंदर्भात मोठी अपडेट समोर आली आहे. परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून कुठल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी




बोलावले जाणार याची माहिती देण्यात आली आहे.

‘एमपीएससी’ने मे २०२३ मध्ये समाज कल्याण विभागातील विविध पदांसाठी जाहिरात दिली होती. राज्यातील हजारो विद्यार्थ्यांनी यासाठी अर्ज केले आहेत. ‘लोकसत्ता’ने सातत्याने हा विषय लावून धरल्यानंतर आयोगाने अभ्यासक्रम आणि परीक्षेची तारीख जाहीर केली. त्यानुसार १९ मे रोजी समाज कल्याण अधिकारी गट ‘ब’ या पदासाठी परीक्षा होणार होती. मात्र, आयोगाने सुधारित आरक्षणनिश्चिती प्राप्त झाल्यानंतरच परीक्षांबाबत घोषणा केली जाईल, असे सांगत ही परीक्षा स्थगित केली. ‘महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४’ ही परीक्षाही स्थगित करण्यात आली होती. मात्र, मराठा आरक्षणानुसार नवीन आरक्षण निश्चिती करून आयोगाने नागरी सेवा परीक्षेची सुधारित तारीख जाहीर केली. परंतु, समाज कल्याण विभागातील विविध पदे आणि अन्य विभागांच्या परीक्षांची तारीख जाहीर न झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण होते. लोकसत्ताने याविषयाला वाचा फोडल्यावर आयोगाने याची दखल घेत शुद्धीपत्र जाहीर केले होते. त्यानुसार १८ ऑगस्टला परीक्षा घेण्यात आली असून आधी खुल्या वर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना आता सामाजिक व शैक्षणिक दृष्टच्या आरक्षणानुसार अर्ज करण्याची संधीही देण्यात आली होती. ‘एमपीएससी’ने मे २०२३ मध्ये समाज कल्याण विभागातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व संबंधित गट अ, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग ४१, समाज कल्याण अधिकारी, गट ब, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग २२, गृह प्रमुख, गट ब, समाज कल्याण आयुक्तालय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील १८ अशा विविध पदांसाठी जाहिरात दिली होती. राज्यातील हजारो विद्यार्थ्यांनी यासाठी अर्ज केले होते.

**तर मुलाखतीसाठी अपात्र ठरणार**

न्यायिक प्रकरणावरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधिन राहून आयोगाच्या संकेतस्थळावर समाज कल्याण अधिकारी गट ब परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. या निकालात प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या उमेदवारांची छाननीअंती पात्रता तपासल्यानंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीस बोलावले जाईल. जाहिरातीमधील तरतुदीनुसार विविध दावे तपासताना वा अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल असे आयोगाने स्पष्ट केले आहे. तसेच मुलाखतीचा कार्यक्रम स्वतंत्ररित्या जाहीर केला जाणार आहे.

# प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.०
# पाणलोट यात्रेद्वारे जनजागर

## गावोगाव जलसंधारणाची चळवळ निर्माण व्हावी – जिल्हाधिकारी अजित कुंभार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अकोला**

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत पाणलोट विकास कार्यक्रम जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. गावे जलसमृद्ध होण्यासाठी गावोगाव जलसंधारणाची चळवळ निर्माण व्हावी, असे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे केले.

मृद व जलसंधारण विभाग हा योजनेचा नोडल विभाग आहे. प्रत्येक गावात जलसंधारण चळवळ निर्माण करून शाश्वत विकासाला चालना देणे हा पाणलोट यात्रेचा उद्देश आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापित असून, जिल्हा जलसंधारण अधिकारी अमोल मस्कर हे सदस्य सचिव आहेत. यात्रेच्या अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन नियोजन करण्यात आले आहे.

पाणलोट यात्रेद्वारे गावागावांत जलसंधारण चळवळ उभी करण्यासाठी लोकप्रबोधन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्री. कुंभार यांनी केले. जलसंधारण विभागासह सर्व संबंधित यंत्रणांनी एकत्रित काम करत ही चळवळ यशस्वी करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

पाणलोट क्षेत्राच्या व्यवस्थापनातून गावे जलसमृद्ध होतील. शेतकऱ्यांना पाण्याची कमतरता भासणार नाही, तसेच शेतजमिनींना अधिक उत्पादक बनविण्याचा प्रयत्न केला जाईल. पाणलोट विकास हा शाश्वत शेती व ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. त्यानुषंगाने जिल्ह्यातील नागरिकांनी मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले.

# ४७ वर्षानंतर शालेय मित्रांचा राजमाता जिजाऊंच्या साक्षीने अमरावती येथे स्नेहमेळावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

जिजामाता जयंतीच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने१९७८ ला न्यू इंग्लिश हायस्कूल वरुड येथून दहावीची परीक्षा पास झालेले सगळे वर्गमित्र अमरावती येथे सहकुटुंब जमले होते.४७ वर्षापासूनची ही वर्गमैत्री पाहून अनेकांना आश्चर्य वाटतं . खरं तर दहावीची परीक्षा पास झाल्यानंतर सर्वजण पुढील शिक्षण घेऊन आपापल्या आयुष्यात रममाण झालेत. वयाच्या साठी नंतर सर्वच जण नोकरी व्यवसाय या सर्व प्रपंचातून निवृत्त झालेत. आयुष्याच्या या दीर्घ कालखंडानंतर सर्व वर्गमित्रांना एकमेकांच्या भेटीची आस लागली. मागील ४ वर्ष हे सर्व वर्गमित्र स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने एकत्र जमतात आणि शालेय जीवनातील गमती जमती, आयुष्यात अनुभवलेले चढ उतार या विचारांची देवाण-घेवाण करतात.असाच हा स्नेह मेळावा अमरावती येथील हॉटेल गौरी येथे दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आला होता. मुंबई, नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ, पुणे, बंगलोर, अमरावती, वरुड, छिंदवाडा या आणि अशा अनेक भागातून ४० पेक्षा जास्त मित्रमंडळी या कार्यक्रमाला सहकुटुंब हजर होती.डॉ शशांक सोनारे यांनी जिजामातेच्या प्रतिमेला हर्रापण करून या मेळाव्याची सुरुवात केली. त्यानंतर सर्वच उपस्थितांनी जिजामातेला ला वंदन करून तिच्या कार्यकर्तुत्वाचे स्मरण केले . तुमची आई आमची आई, वीर माता जिजाबाई या घोषणेने सभागृह दणाणून सोडले.त्यानंतर सर्वांनी आपापल्या अनुभवांचे कथन केले. दोन अडीच तास चाललेल्या या अनुभव कथनांमध्ये रमून जाताना प्रत्येक जण एकमेकांची थट्टा मस्करी करित खळखळून हसत होते. शालेय जीवनातील घटनांची उजळणी करत होते.वय, पद-प्रतिष्ठा सर्वांचा विसर पडत हे दोन तास खऱ्या अर्थाने बालपण जगण्याचा अनुभव देऊन गेले.कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता शशांक सोनारे व त्यांचे कुटुंबीय यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनात पुढाकार घेतला तसेच उमेश पाटणकर, लीलाधर बेलसरे, विकास होले या मंडळींनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण देशमुख यांनी केले.सकाळी ११ वाजता सुरू झालेला या स्नेह मिळाव्याचा समारोप सायंकाळी सहा वाजता वर्गमित्र शशांक सोनार यांच्या नांदगाव एमआयडीसीतील कंपनीला भेट देऊन व त्यांच्या प्रगतीचे कौतुक करून. करण्यात आला.अनेकांना नागपूर, यवतमाळ, चंद्रपूर ला परत जायचे असूनही निरोप घेताना मित्रांचा पाय निघत नव्हता.

# मैदानावरील पारंपरिक खेळ होताहेत नामशेष
# आधुनिक जीवनशैली,तासनतास मुलं मोबाईलमध्ये व्यस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

मैदानी खेळ आणि विद्यार्थी यांचे नाते फार पूर्वीपासूनचे आहे. आधुनिक युगात मानवी जीवनशैलीत अनेक बदल होत आहेत. अलीकडे, मैदानी खेळांचे आकर्षण कमी होत आहे. पूर्वी गल्लीत पळापळीची शर्यत होत असे. आता त्याची जागा शालेय जीवनातील धावण्याच्या स्पर्धेतील सहभागापुरती मर्यादित राहिली आहे. गेल्या काही वर्षांपूर्वीचे मुला-मुलींचे गल्लीबोळातील आणि मैदानावरील अनेक पारंपरिक खेळ आता नामशेष झाले आहेत.

आजघडीला प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आला आणि सगळे विसरून जाऊन केवळ ऑनलाइन राहण्यावर जोर देत आहेत. पूर्वी मोठ्या प्रमाणात



खेळण्यासाठी मोठमोठीखेळण्यासाठी जागा शोधण्याची गरजच नव्हती. मात्र, आता तशी स्थिती राहिली नाही. या युगात मैदानासाठी जागाच राहिली नाही. त्यामुळे खेळायचे कुठे? हासुद्धा मोठा गहण प्रश्न निर्माण

झाला आहे. पूर्वी शाळा सुटली की, धावत-पळत घरी जाऊन अनेक मित्र मैत्रिणी एकत्र येऊन पारंपरिक पद्धतीचे मैदानी खेळ मोठ्या उत्साहात खेळत असत. याची जागा आता तासन तास घरात बसून संगणकीय गेम आणिमोबाइलवरील खेळांनी घेतली आहे. जुने पारंपरिक विविध प्रकारचे मैदानी खेळ लोप पावत आहेत. सध्याच्या गल्लीबोळातील एकमेव आणि परदेशी क्रिकेट हा शारीरिक व्यायामाचा खेळ शिल्लक आहे.

### इंकी-पिंकी व्हॉट कलर

लहान मुलांचा आवडता खेळ म्हणजे डेकी-पिंकी व्हॉट कलर. रेस टीप, विष की अमृत, लाकडी भोवरे हे खेळही आता खेळले जात नाही. सायकलचे बिनकामी टायर आता रस्त्याने फिरविले जात नाही. आट्या-पाट्या, गोट्या, तळ्यात- मळ्यात, टोच-पाच, राजा-राणी, चोर-पोलिस, बॅडबा-गोळी, टियू- लंगडी, गिल्ली-दांडू खेळण्याचे प्रमाणसुद्धा नगण्य आहे.

### लगोरीची क्रेझ झाली कमी

काही वर्षापूर्वी लगोरी खेळाची क्रेझ होती. कवेलूची खापरंडे त्या कामी उपयोगात येत होती. चिंचोके, सीताफळाच्या बिया लपविणे, फळी-चेंडूचे डाव, दगड-मातीपासून किल्ले तयार केले जायचे. गोठ्याची जागा आता बुद्धिबळातील गोट्या, सापशिडींनी, व्हिडीओ गेम व लुडो नावाच्या विदेशी खेळाने घेतली आहे.

# न्याय देणारी व्यवस्था आरोपीला वाचवण्यासाठी : रोहित पवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १३ बीड**

बीडमधील केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला ३५ दिवस उलटूनही अद्याप या हत्याकांड प्रकरणातील एक आरोपी फरार आहे. तर, वाल्मिक कराडविरोधात कठोर कारवाई झालेली नाही. अद्याप या प्रकरणात कोणालाही शिक्षा झालेली नाही. वाल्मिक कराड वगळता इतर आरोपींवर मोक्का कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, विरोधी व सत्ताधारी पक्षांमधील नेते, आमदार वाल्मिक कराडवर कारवाई व्हावी यासाठी आंदोलन करत आहेत. दुसऱ्या बाजूला संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांना धमक्या दिल्या जात आहेत. भावाच्या मारेकऱ्यांना शिक्षा व्हावी यासाठी धनंजय देशमुख कायदेशीर लढाई लढत आहेत. मात्र, त्यांना ही लढाई लढण्यापासून रोखण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे संतापलेल्या धनंजय देशमुख यांनी आज (१३ जानेवारी) आंदोलन केलं. धनंजय देशमुखांनी पोलीस तपासावर नाराजी व्यक्त केली. तसेच, मोबाइल टॉवरवर चढून जीव देणार असल्याचा इशारा त्यांनी दिला होता. त्यानुसार आज ते टॉवरवर चढले. तर, मस्साजोगच्या ग्रामस्थांनी देखील गावात तीव्र आंदोलन केलं. धनंजय देशमुखांनी आत्महत्या करू नये यासाठी प्रशासन व अनेक नेत्यांनी त्यांची विनंती केली.

# राजाराम प्रतिष्ठानच्या दिनदर्शिकेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

राजाराम प्रतिष्ठानच्या २०२५ सालाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभ हस्ते नागपूर येथील त्यांच्या निवासस्थानी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.या कार्यक्रमाला राजाराम प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. किरणताई महल्ले आणि उपाध्यक्ष ऋषिकेश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रतिष्ठानचे शुभम घोम आणि हिमांशु गोस्वामी हे प्रामुख्याने



उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, ‘‘संयम, स्थितप्रज्ञता आणि सहनशीलतेने कठीण प्रसंगावर मात करता येते. प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात उत्कृष्टतेचा ध्यास घेतला पाहिजे.‘‘राजाराम प्रतिष्ठानने या दिनदर्शिकेचे वितरण नवसारी प्रभागातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचे काम हाती घेतले आहे. उपाध्यक्ष ऋषिकेश देशमुख यांनी सांगितले की, या दिनदर्शिकेद्वारे प्रतिष्ठानच्या उपक्रमांची माहिती समाजापर्यंत पोहोचवण्याचा हेतू आहे.मुख्यमंत्री फडणवीस यांनी पाठीवर कौतुकाची थाप देत कार्यकर्त्यांना आगामी काळात समर्पित कामासाठी प्रोत्साहन दिले. या भेटीमुळे नव्या उर्जेचा अनुभव मिळाल्याचे कार्यकर्त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन आणि दिनदर्शिकेच्या प्रकाशनामुळे राजाराम प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांमध्ये नवी उमेद निर्माण झाली आहे. यशाच्या दिशेने प्रेरणा देणारा हा सोहळा भविष्यातील कामगिरीसाठी दिशादर्शक ठरेल.

# मधमाश्यांचे पोळे अघोरीपणे नष्ट करणे पडणार महागात

## आग लावून, कीटकनाशक फवारून नष्ट कराल, तर बसेल जबर दंड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

मधाच्या हव्यासापोटी व त्यातून दोन पैसे मिळतात, म्हणून मधमाश्यांच्या पोळ्याला आग लावून कीटकनाशक फवारून ते नष्ट करण्याचा प्रयत्न होत असतो, मात्र हा प्रयत्न तुम्हाला महागात पडू शकतो. वन्यजीव संरक्षण अधिनियमामध्ये मधमाश्यांच्या संदर्भात उल्लेख असून, कलम ५०, ५१ नुसार तीन वर्षांचा तुरुंगवास किंवा २५ हजार रुपये ते एक लाखापर्यंत दंड होऊ शकतो. आग लावून ते नष्ट करणे अयोग्य असून, तो कायद्याने गंभीर गुन्हा आहे.

निसर्गाच्या जीवनचक्रामध्ये मधमाश्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मधमाश्या



परागीभवनाच्या प्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतात.परागीभवन, म्हणजे वनस्पतीमधील प्रजननाचा महत्त्वाचा भाग, परागीभवन झाले, तरच वनस्पती आपले बीज तयार करू शकतात.

मोहोळ अडचणीचे ठरल्यास जवळच्या मोहोळ होळणाऱ्या माहीतगार व्यक्तीला बोलावून त्याला उठून लावावे. एकदा दोनदा मोहळ उठून लावल्यानंतर ते पुन्हा त्या जागेवर येण्याचे टाळते. मधमाश्यांच्या परागीकरणावरच पिकांच्या उत्पादनात वाढ होते. त्यामुळे मधमाश्यांचे पोळे अघोरीपणे नष्ट करणे कायद्याने गुन्हा ठरेल.

जर कोणी मधमाश्यांचे पोळे जाळले किंवा त्यावर औषध फवारून ते नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तर तो एक गंभीर गुन्हा आहे. या कृतीमुळे पर्यावरणाचे नुकसान तर होतेच; पण मधमाशांही नष्ट होतात. शिवाय कायद्याचेही उल्लंघन होते. वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ मध्ये कलम २ (३१) मध्ये मधमाश्यांच्या पोळ्याच्या संदर्भात स्पष्ट उल्लेख असून, कलम ५०, ५१ नुसार तीन वर्षाचा तुरुंगवास किंवा २५ हजार रुपये ते एक लाख रुपयापर्यंत दंड होऊ शकतो.

# शासन निर्णयाला ठेंगा, मुख्यालय सोडून एसीएफचा अमरावतीत ठिय्या

## मुख्य वनसंरक्षकांचे अभय; गौण खनिज तस्करीत वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**

राज्याच्या वन विभागाने मोर्शी, वरूड या दोन वनपरिक्षेत्राकरिता स्वतंत्रपणे सहायक वनसंरक्षकांची नियुक्ती केली असून, मुख्यालय हे मोर्शी निश्चित करण्यात आले आहे. असे असताना सहायक वनसंरक्षक डॉ. मयूर भैलुमे हे मुख्यालयात कर्तव्य न बजावता त्यांनी अमरावती येथे ठिय्या मांडला आहे. हा प्रकार शासन निर्णयाची पायमल्ली करणारा असतानासुद्धा वरिष्ठांकडून एसीएफ डॉ. भैलुमे यांना अभय मिळत असल्याचे चित्र आहे.




राज्याच्या महसूल व वन विभागाचे सहसचिव द. ल. थोरात यांच्या स्वाक्षरीने १५ जानेवारी २०१५ रोजी सहायक वनसंरक्षकांच्या कार्यक्षेत्रातील बदल निश्चित करण्याबाबत शासन निर्णय जारी केला होता. त्यानुसार मोर्शी, वरूड या वनपरिक्षेत्राकरिता सहायक वनसंरक्षक (कॅम्पा व वन्यजीव) यांची नियुक्ती करून मोर्शी हे मुख्यालय ठरविले आहे, तर महसूल विभागाच्या धर्तीवर वन विभागात उपवनविभाग, तसेच त्यांचे कार्यक्षेत्र व मुख्यालय निश्चित करून सहायक वनसंरक्षकांना कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करून ३ सप्टेंबर २०१४ रोजी उपसचिव नं. मा. शीलवंत यांच्या स्वाक्षरीने शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहे.

> ''सहायक वनसंरक्षकांनी मुख्यालयी राहूनच कर्तव्य बजवावे, असे शासनाला अपेक्षित आहे. मात्र, डॉ. मयूर भैलुमे हे मोर्शी ऐवजी अमरावतीतून कारभार हाकत असतील तर हा नियमबाह्य प्रकार खपवून घेणार नाही. येत्या दोन दिवसांत या प्रकरणाची शहानिशा करून तसे आदेश दिले जातील.''
>
> **– एम. श्रीनिवास राव**
> **प्रधान मुख्य वनसंरक्षक (दुय्यम संवर्ग कार्मिक)**

राज्यातील २२६ सहायक वनसंरक्षकांचे कार्यक्षेत्र आणि मुख्यालय शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आले असताना एकमात्र मोर्शी मुख्यालयाचे सहायक वनसंरक्षक डॉ. मयूर भैलुमे यास अपवाद ठरले आहे. वरिष्ठांना काही तरी वेगळे कौटुंबिक कारण सांगून डॉ. भैलुमे यांनी अमरावतीत बस्तान मांडण्याची शक्कल लढविली आहे. त्यांच्या या नियमबाह्य प्रकाराला अमरावती प्रादेशिकच्या मुख्य वनसंरक्षक जयोती बॅनर्जी यादेखील तेरी भी चूप, मेरी भी चूप असे म्हणून मूक संमती देत आहेत.

**गौण खनिज, वन तस्करीला जबाबदार कोण?**

गेल्या चार महिन्यांपासून सहायक वनसंरक्षक डॉ. मयूर भैलुमे हे मोर्शीऐवजी अमरावती येथून कारभार हाकत आहेत. या चार महिन्यांच्या कालावधीत मोर्शी, वरूडमध्ये मोठ्या प्रमाणात गौण खनिज, वन तस्करीला उधाण आले आहे. राखीव जंगलातून नदी, नाले, ओढ्यातून वाळू तस्करी होत आहे. वरूड येथील वन नाक्याहून सागवान तस्करी होत आहे. तर बाजारात खुलेआम वन्यजिवांसह मांस विक्री ही नित्याचीच बाब झाली आहे. सहायक वनसंरक्षक मुख्यालयी राहत नसल्याने मोर्शी, वरूड वनपरिक्षेत्रात असे गंभीर प्रकार घडत असल्याचे बोलले जात आहे.

# वाण खरेदी करण्याकडे महिलांचा कल : तिळगूळ देत स्नेह वृद्धिंगत होण्याची दिली जाते शुभकामना

## घरी उपयोगात येणाऱ्या वाणाला महिलांची अधिक पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

संक्रांतीचा सण उद्या१४ जानेवारीला साजरा होणार आहे. विवाहित महिला या दिवशी हळदीकुंकू देत सौभाग्यवाण देतात. जास्त महाग असलेल्या वाणाची विशेष चर्चा महिलांमध्ये असते. त्यामुळे महाग मात्र नावीन्यपूर्ण व घरी उपयोगात येणारे वाण खरेदी करण्याकडे महिलांचा कल असतो. प्रत्येक महिला आपल्या बजेटनुसार वाण खरेदी करीत असतात. पूर्वी परंपरा म्हणून एखादे वाण दिले जात होते. वाण स्वरूपात मिळालेली वस्तू उपयोगात येत नव्हती. मात्र, आता घरगुती कामात येईल, अशी वस्तू वाण म्हणून देण्याकडे महिलांचा कल वाढला आहे.



मकरसंक्रांतीच्या सणापासून सूर्याचे उत्तरायणास आरंभ होतो. हिंदू संस्कृतीत मकरसंक्रांतीच्या सणाचे विशेष महत्त्व आहे. विशेष म्हणजे, हा महिलांचा सण समजला जातो. घराघरात हळदीकुंकू साजरे करतात. त्याचबरोबर आता सार्वजनिक स्तरावरील हळदीकुंकवाचे कार्यक्रम केले जातात. मकरसंक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत हळदीकुंकू केले जाते. या निमित्ताने मैत्रिणी आणि सुवासिनींना घरी वाण देण्याघेण्यासाठी बोलावले जाते. परस्परांना तिळगूळ देत स्नेह वृद्धिंगत होण्याची शुभकामना दिली जाते. मकरसंक्रांतीमध्ये जे हळदीकुंकू करतात, त्या वाणाचे विशेष महत्त्व आहे.विशेष महत्त्व आहे. विशेष म्हणजे, हा महिलांचा सण समजला जातो. घराघरात हळदीकुंकू साजरे करतात. त्याचबरोबर आता सार्वजनिक स्तरावरील हळदीकुंकवाचे कार्यक्रम कैले जातात. मकरसंक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत हळदीकुंकू केले जाते. या निमित्ताने मैत्रिणी आणि सुवासिनींना घरी वाण देण्याघेण्यासाठी बोलावले जाते. परस्परांना तिळगूळ देत स्नेह वृद्धिंगत होण्याची शुभकामना दिली जाते. मकरसंक्रांतीमध्ये जे हळदीकुंकू करतात, त्या वाणाचे विशेष महत्त्व आहे.

**संक्रांतीच्या दिवशी तिळाचे महत्त्व**

संक्रांतीच्या दिवशी तीळमिश्रित उदकाने स्नान करावे. तिळाचे उटणे अंगास लावणे, तीलतर्पण तील होम, तीलभक्षण व तील दान, अशा सहा प्रकारे तिळाचा उपयोग केल्यास आपल्याला नक्कीच पुण्यप्रद असल्याचे शास्त्रवचन आहे.

या दिवसात शेतात आलेल्या धान्याचे वाण स्त्रिया एकमेकींना देतात. हरभरा, ऊस, बोर, तीळ, गव्हाची ओबी असे सौभाग्यवाण देवीला अर्पण करून वाण दिले जाते. अशी प्रथा आहे.

# शंकरपटातून ग्रामीण अर्थव्यवस्थेत होते लाखो रूपयांची उलाढाल : शेतकरी बांधवाचा जिव्हाळ्याचा खेळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३धामणगाव रेल्वे**

दिवाळीनंतर शेतीचा हंगाम आटोपल्यावर ग्रामीण भागात संस्कृतीशी नाळ जपलेला शेतकरी बांधवांचा अत्यंत जिव्हाळ्याचा व आनंदाचा खेळ म्हणजे बैलाचा शंकरपट होय. साधारणतः जानेवारी महिन्यात तालुक्यात मोठ्या प्रमाणावर गावोगावी पटाचे आयोजन करण्यात येते. यातून मनोरंजनासोबतच ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेत लाखोंची उलाढाल होत असून, अनेकांना रोजगारसुद्धा मिळत आहे.



शंकरपट हा केवळ खेळ नसून ती ग्रामीण भागाची परंपरासुद्धा आहे. बैलगाडी शर्यतीला जवळपास शंभर वर्षांची परंपरा आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये जानेवारी महिन्यातशंकर पटाचे आयोजन करण्यात येते. डिसेंबर महिना आटोपताच पाटाच्या दाणी तयार करण्याचे काम केले जाते. अनेक गावांमध्ये पूर्वीपासूनच पटाच्या दाणीसाठी जागा राखीव ठेवण्यात आलेली आहे. तसेच महिन्याच्या तारखासुद्धा पटासाठी फार पूर्वीपासूनच राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. ज्या गावात पटाचे आयोजन केले जाते, त्या गावातील लोकांमध्ये जणू उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळते. गावाशेजारील सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांना पट पाहण्यासाठी सुटी देण्यात येते. पटाच्या गावी व परिसरातील घरोघरी पाहुण्यांची मोठ्या प्रमाणात रेलचेल असते. शंकरपट हे केवळ मनोरंजनाचे – साधन नाही तर त्यातून ग्रामीण – अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात चालना मिळते. शंकरपट कमीत कमी दोन ते तीन दिवसांचा असते. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात भाजीपाला, कपडे, सौंदर्य प्रसाधने, चहा टपरी, खाद्यपदार्थ, खेळणी, मनोरंजन, साहित्याची दुकाने लागून त्यातून स्थानिकांना रोजगार मिळतो. रात्री नाटक, कीर्तन, गोंधळ, लावणी, कव्वाली यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होते. त्यामुळे ग्रामीण भागात उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.

**जिल्ह्यात शंकरपटाला सुरुवात**

डिसेंबर महिन्यापासून जिल्ह्यात शंकरपटाला सुरुवात झाली आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात शंकरपट भरतो. अनेकांची घरी सणासारखे नातेवाईक येत असतात.

# पालकमंत्री वाटपाचा घोळ दोन दिवसात संपणार, बावनकुळेंचे संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नागपूर**

प्रथम नेता निवडीला उशीर, नंतर मंत्रीपद वाटपाचा घोळ, मंत्रीमंडळाचा शपथविधी झाल्यावर खातेवाटपाला विलंब आणि आता खातेवाटप झाल्यावर पालकमंत्री ठरवण्यावरून वाद अशी महायुती सरकारची आतापर्यंतची वाटचाल राहिली आहे. अशात दोन दिवसात पालकमंत्री वाटपाचा घोळ संपणार असे संकेत, भाजपचे प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे दिले. ते पत्रकारांशी बोलत होते.

पालकमंत्री ठरवण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बावनकुळे यांच्याकडे दिली होती. घटक पक्षांशी चर्चा करून पालकमंत्री ठरवावे, असे फडणवीस यांनी सांगितले होते. त्यालाही दोन आठवडे झाले. मात्र अद्याप नागपूरसह एकाही जिल्ह्याला पालकमंत्री मिळाला नाही. यावरून या मुद्यावरून महायुतीत वाद आहे असे स्पष्ट होते.या



पार्श्वभूमीवर सोमवारी बावनकुळे यांना विचारले असता ते म्हणाले, १५ ,१६ तारखेपर्यंत पालकमंत्री पदाचा विषय सुटलेला असेल. मुख्यमंत्री अजित दादा एकनाथ शिंदे आमच्या दोन–तीन बैठकी झाल्या आहे. पालकमंत्री पदाचे वाटप अंतिम टप्प्यात आहे, असे बावनकुळे म्हणाले.

**राऊत यांनी विकासावर बोलावे**

संजय राऊत दिवसभर वटवट करत असतात ते पराभवाच्या मानसिकतेत आहे. अंधारात दिवा घेऊन फिरत आहे. आता त्यांचा वेळ संपला आहे महाराष्ट्राची गद्दारी केली पुढच्या काळात त्यांना भविष्य नाही रोज सामनातून टीका करण्यापेक्षा पक्ष वाढवा.

जुन्या गोष्टी काढून आता राजकारण करता येणार नाही. आता नवीन काळ सुरू झाला आहे. संजय राऊत यांना विकासासाठी जर रोज सकाळी काही सुचवायचा असेल त्यांनी विकासावर बोलावं. रोजचे टोमणे बंद झाले पाहिजे. विरोधकांनी महाराष्ट्राच्या विकासाला साथ द्यावी आम्ही त्यावर काम करू, असे बावनकुळे म्हणाले.

**स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजप तयार आहे. जेव्हा निवडणुका लागेल, पूर्ण ताकदीने मैदानात उतरू. कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांसोबत जाऊन काम करू, भारतीय जनता पार्टी नंबर एकचा पक्ष आहे .पण आम्ही महायुती म्हणूनच पुढे जाऊ, असे बावनकुळे म्हणाले.

# प्रवेशासाठी खोटी कागदपत्रे द्याल, तर होणार कारवाई

## शिक्षण विभागाची भूमिका : आरटीईतील एजंटांना बसणार चाप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**

आरटीईअंतर्गत प्रवेश घेताना अनेक पालक दलालांच्या भूलथापांना बळी पडतात. तसेच काही पालक खोटी कागदपत्रे देऊन फसवणूक करत असल्याचे शिक्षण विभागाच्या निदर्शनास आले आहे. जवळची शाळा मिळण्यासाठी खोटी कागदपत्रे. भाडेकरार, आधारची खोटी माहिती दिल्यास जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने दिलेल्या सूचनेनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा शिक्षण विभागाने दिला आहे.शिक्षण हक्क कायद्यान्वये अंतर्गत शाळेत प्रवेश घेताना ठरलेल्या निकषासाठी पालकांकडून खोटी माहिती देण्याचे प्रकार यापूर्वी घडले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने शाळेच्या जवळच्या निकषांमध्ये बसण्यासाठी चुकीचे भाडेकरार दिले जातात.त्याचबरोबर उत्पन्नाच्या अटीमध्ये बसण्यासाठी चुकीचा उत्पन्नाचा दाखला दिला जातो. यासाठी काही दलाल सक्रिय होतात. तेपालकांकडून हजारो रुपये घेऊन पालकांची फसवणूक करतात.

गतवर्षी घडल्या अनेक घटनामागील वर्षी नागपूर जिल्ह्यात आरटीईचा मोठा गोंधळ समोर आला होता. चंद्रपुरातही काही प्रकरणे समोर आली होती. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून प्रवेश रद्द करण्यात आले होते. आता असा प्रकार घडू नये म्हणून शिक्षण विभाग सतर्क झाला आहे.

# बांगलादेशी रोहिंग्या बाबत किरीट सोमय्या यांची तपास अधिकाऱ्यांशी चर्चा : रोहींगे नोंदणी आरोपाबाबत सोमय्या ठाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अंजनगावसुर्जी**

येथील तहसिलदारांनी बंगलादेशी रोहिंग्यांना जन्मनोंदणी बाबत आदेश दीले असल्याचा आरोप भाजप नेते डॉ किरीट सोमय्या यांनी केल्या नंतर गेल्या चार दिवसांपासून अंजनगाव तालुक्यात मोठी खळबळ माजली असून या संदर्भात असलेल्या प्रशासनातील सर्व विभाग ॲक्शन मोडवर आले आहे या प्रकाराबाबत चौकशी सुरू असली तरी याबाबत माहिती घेण्यासाठी किरीट सोमय्या हे सोमवारी (ता.१३) येथील तहसील कार्यालयात दाखल होऊन त्यांनी या प्रकरणांचा तपास करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांनी नियुक्त केलेल्या चौकशी पथकातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली यावेळी तहसील कार्यालय परिसरात मोठी गर्दी पाहायला मिळाली.शिर्डी येथे सुरू असलेल्या भाजपच्या कार्यक्रमातून सोमय्या रविवारी (ता.१२) रात्री अकोट येथील शासकीय विश्राम गृह येथे मुक्काम करून सोमवारी (ता.१३)सकाळी ०९ वाजता ते अंजनगावात दाखल होऊन येथील भाजप चे जिल्हा उपाध्यक्ष विक्रम पाठक यांच्या मोती महल कॉलनी येथील निवासस्थानी चहापान कार्यक्रम होऊन सोमय्या ठीक १० वाजता तहसील कार्यालय येथे पोहोचले यावेळी तहसिलदार पुष्पा सोळंके यांच्या समक्ष जिल्हाधिकाऱ्यांनी नियुक्त केलेल्या चौकशी पथकाचे प्रमुख उपविभागीय अधिकारी सद्या प्रभारी असलेले रविंद्र कानडजे,उपविभागीय पोलिस अधिकारी सिद्धेश्वर धुमाळ,



मुख्याधिकारी दादाराव डोल्हारकर,प्रभारी गटविकास अधिकारी कल्पना जायभाये हे उपस्थित होते सुमारे तासभर श्री सोमय्या यांनी या प्रकरणी अधिकाऱ्यांशी चर्चा केली बाहेर पडताच पत्रकारांनी त्यांना विचारले असता त्यांनी रोहिंगे नोंदी झाल्या असल्याच्या आपल्या आरोपावर आपण ठाम असून मालेगाव मध्ये विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या काळात व्होट जिहाद फंडिंग घोटाळा उघडकीस आला होता त्यात २२०० कोटी रुपये जिराद मोहम्मद व मोहम्मद बगाड यांच्या खात्यात आले होते आणि त्यातील ३१९ कोटी रुपये मुस्लिम संस्था व व्होट जिहाद या कामासाठी वापरण्यात आला व त्यातील काही पैसा बांगलादेशी रोहिंग्यासाठी जन्माचा दाखला यासाठी असे तपासात समोर आले यात २०२४ च्या शेवटच्या चार महिन्यात नऊशे लोकांना जन्माचे दाखले देण्यात आले त्यातील नव्व्यांनव टक्के हे मुस्लिम होते त्याची चौकशी केली तर लक्षात आले की हे फार मोठे छळयंत्र आहे याबाबत वर्तमान पत्रात जाहिरात द्यावी लागते आणि त्या जाहिरातीमुळे हा प्रकार अंजनगाव च्या एका कार्यकर्त्याने दहा दिवसांपूर्वी आमच्या लक्षात आणून दिली तेव्हा हा प्रकार समोर आला अंजनगाव शहरात वीस हजार मुस्लिम संख्या असताना चौदाशे अर्ज आले आहे आता याबत एस आय टी चौकशी होऊन कारवाई होणार असे किरीट सोमय्या यांनी सांगितले या प्रकारामुळे आता तालुक्यात याबाबत मोठ्या प्रमाणात चर्चा होत असून चौकशीतून काय समोर येते याकडे सर्वांची उत्सुकता लागली आहे

जिल्हाधिकाऱ्यांनी नेमलेल्या चौकशी समितीच्या सदस्यांची सभा होऊन चौकशी सुरु करण्यात आल्याचे समजले असून तहसील कार्यालयात दाखल झालेल्या प्रकरणातील दाखले देण्याचे आदेश झालेली प्रकरण व पेंडिंग असलेली सर्व प्रकरणांच्या संपूर्ण कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार असल्याचे समजले.